# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

शनिवार, १६ डिसेंबर २०२३

किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

मराठी दैनिक

वर्ष - ०३ अंक - १२५

आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SUNDAY 16 DECEMBER. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-125 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05







# कृष्ण जन्मभूमी; न्यायालयाचा हस्तक्षेपास नकार

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : मथुरेतील शाही ईदगाह मशिदीचे वैज्ञानिक सर्वेक्षण केले जाणार आहे. शाही ईदगाह मशीद ही कृष्ण जन्मभूमीवर उभारण्यात आली आहे, असा दावा करत हिंदू संघटनांनी केला आहे. तसेच या मशीद परिसराचे वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याची मागणी करणारी याचिकाही त्यांनी अलाहाबाद उच्च न्यायायात दाखल केली होती. गुरुवारी यावर निकाल देताना न्यायालयाने वैज्ञानिक सर्वेक्षणास परवानगी दिली. आधी मथुरा न्यायालयाने याप्रकरणी सर्वेक्षणास परवानगी होती. त्यानंतर मुस्लीम पक्षकारांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. काल उच्च न्यायालयानेही मशीद परिसराचे वैज्ञानिक सर्वेक्षण करण्याची परवानगी दिली. त्यानंतर मुस्लीम पक्षकारांनी शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. परंतु, सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयाने मशिदीच्या वैज्ञानिक सर्वेक्षणास स्थगिती दिली नाही.**

शाही ईदगाह मशीद परिसराचे न्यायालयाच्या देखरेखीखाली अधिवक्ते आणि आयुक्तांच्या तीन सदस्यीय पथकाकडून प्राथमिक सर्वेक्षण केले जाईल. आयुक्तांसह या सर्वेक्षणात किती लोक सहभागी होतील? सर्वेक्षण कधी सुरू केले जाईल? मशीद परिसरातील कोणकोणत्या भागांचं सर्वेक्षण केले जाईल? याबाबतचा निर्णय १८ डिसेंबर रोजी घेतला जाईल. भगवान श्री कृष्ण विराजमान ट्रस्ट आणि इतर सात जणांनी विधीज्ञ हरी शंकर जैन, विष्णू शंकर जैन, प्रभाष पांडे आणि देवकी नंदन यांच्या माध्यमातून अलाहाबाद उच्च न्यायालयात मशिदीच्या वैज्ञानिक सर्वेक्षणाची मागणी करणाऱ्या याचिका दाखल केल्या होत्या. हिंदू संघटनांनी म्हटले आहे की, ही भूमी (शाही ईदगाह मशीद असलेली जागा) भगवान श्रीकृष्णाचे जन्मस्थान आहे. येथे पूर्वी श्रीकृष्णाचे भव्य मंदिर होते. मुघल बादशाह औरंगजेबाच्या आदेशानंतर मुघलांनी हे मंदिर पाडून तिथे मशीद बांधली.



शाही ईदगाह मशिदीच्या सर्वेक्षणाआधी वाराणसीतल्या ज्ञानवापी मशीद परिसराचं एएसआय सर्वेक्षण करण्यात आले होते. न्यायालयाने नियुक्त केलेल्या आयुक्तांच्या देखरेखीखालीच हेदेखील सर्वेक्षण करण्यात आले. दरम्यान, हिंदू पक्षकारांनी मागणी केली होती की शाही ईदगाह मशीद परिसराचं सर्वेक्षण करताना व्हिडीओ कॅमेऱ्याद्वारे चित्रण केले जावे. तसेच फोटोही काढावेत. हिंदू पक्षकारांनी दावा केल्याप्रमाणे शाही ईदगाह परिसरात हिंदूंची प्रतीके, चिन्हे आणि मंदिर पाडून त्याच जागी मशीद बांधल्याचे पुरावे शोधण्याचे काम या एएसआय सर्वेक्षणाद्वारे केले जाईल.

# खंडोबारायाच्या यात्रेला वैभव मिळवून देण्यासाठी कटिबद्ध

## आमदार श्यामसुंदर शिंदे : कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय नाही

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** दक्षिण भारतातील सुप्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र खंडोबारायाची यात्रा जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात होणार असून यात्रेनिमित्त काल दि. 15 डिसें रोजी माळेगाव यात्रा येथे लोहा कंधारचे लोकप्रिय, कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागांच्या विभाग प्रमुखांची आढावा बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, जिल्हा परिषद नांदेडच्या प्रशासक तथा मुख्यकार्यकारी अधिकारी मीनल करणवाल, उपविभागीय अधिकारी शरद मंडलिक, उपविभागीय पोलीस अधिकारी मारुती थोरात, पशुसंवर्धन अधिकारी बोधनकर, जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, जिल्हा आरोग्य अधिकारी शिंदे , लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डि .के. आडेराघो, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक चंद्रसेन पाटील, खरेदी विक्री संघाचे सभापती स्वप्नील पाटील उमरेकर, उपमुख्यकार्यकारी अधिकारी संजय तुबाकल्ले, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शाम अण्णा पवार,बाजार




समितीचे उपसभापती अण्णाराव पवार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक भास्करराव ढेपे, पाणीपुरवठा उपअभियंता डिकळे, लोहा नगर परिषदेच्या मुख्याधिकारी प्रियंका टोंगे, माळेगावचे सरपंच धुळगंडे सह सर्व विभागाचे विभाग प्रमुख, अधिकारी ,कर्मचारी या बैठकीस उपस्थित होते. यावेळी आढावा बैठकीत विविध विभागाच्या विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाचा यात्रेदरम्यानच्या काळातील लेखाजोगा सादर केला, लोहा कंधार मतदारसंघाचे आ. श्यामसुंदर शिंदे यांनी माळेगाव यात्रा आढावा बैठकीत सर्व विभाग प्रमुखांना मार्गदर्शन करून यात्रा काळातील नियोजना संदर्भात योग्य त्या सूचना दिल्या, यावेळी आ. शिंदे म्हणाले की, श्रीक्षेत्र खंडोबारायांच्या यात्रेला अधिक अधिक वैभव मिळवून देण्यासाठी मी या भागाचा भूमिपुत्र या नात्याने सदैव कटिबद्ध असून यात्रा काळात मूलभूत विकास कामासाठी मी निधीची कमतरता भासू देणार नसून यात्रेकरूंना स्वच्छ पिण्याचे पाणी, दर्शन रांगेतील महिला पुरुष सुरक्षित व्यवस्था, वीज, पथदिवे, शौचालय, यासह विशेषता महिला भगिनींना व अबालवृद्धांना यात्रा काळात कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची प्रशासनाने काळजी घ्यावी. जर भाविक भक्त व यात्रेकरूंना मूलभूत सुविधा पुरविण्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची कदापि गय केली जाणार नसल्याचे यात्रा आढावा बैठकीत बोलताना आमदार श्यामसुंदर शिंदे यांनी स्पष्ट केले, माळेगाव यात्रेतील अतिक्रमण हटविण्यात आले असून गोरगरीब व्यापाऱ्यांना बीओटी तत्त्वावर गाळे बांधकाम करून देण्यासाठीही निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आमदार शिंदे यांनी सांगून श्रीक्षेत्र खंडोबारायांची यात्रा शांत व निर्भयपणे पार पाडण्यासाठी प्रशासनासह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, भक्तांनी व यात्रेकरूंनी सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी आ. शिंदे यांनी केले. बैठकीस शेकापचे अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष शेख शेरू भाई, बोरगावचे सरपंच प्रतिनिधी पुंडलिक पाटील बोरगावकर, शेकाप लोहा तालुका अध्यक्ष नागेश हिलाल, सिद्धू पाटील वडजे, सुधाकर सातपुते, सतीश कराळे, जोशी समाज समितीचे जिल्हाध्यक्ष दशरथ मोरे सह सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पंचायत समिती लोहाचे विस्तार अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.







## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# साधेपणा आणि त्यागाची मूर्ती : ज्ञानेश्वरांची माता

आधुनिक केसरी

आणि लवकरच विठ्ठलपंत आणि रुख्मीणीचा विवाह झाला. विवाहानंतर सिद्धोपंत या दोघांना विठ्ठलाच्या पायावर घालण्यासाठी पंढरपूरला घेऊन गेले. दर्शन घेतल्यावर विठ्ठलपंतानी सांगितले की मी उत्तरेकडील सर्व तीर्थे केली आहेत, आता दक्षिणेकडील तीर्थे करून येतो .आपण परवानगी द्यावी.केवढी ही विरक्ती ! तीर्थयात्रेहून ते परत आले आणि रखुमाबाईला आपल्यासोबत आपल्या गावी आपेगावला घेऊन गेले. पण पुढे काही दिवसांनी विठ्ठलपंतांचे आईवडील वारल्यानंतर सिद्धोपंत या दोघांना घेऊन आळंदीला आले.आणि तेथेच ते दोघे राहू लागले. खरं म्हणजे विठ्ठलपंत आणि रखुमाबाई यांचा संसार चारचौघांसारखा कधी झालाच नाही. कारण विठ्ठलपंतांच्या डोक्यात नेहमी विरक्तीचे विचार यायचे आणि संन्यास घेण्याची तीव्र इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली होती.तसे त्यांनी वेळोवेळी बोलूनही दाखवले होते.पण रुख्मिणीबाईंनी त्यांना परवानगी नाकारली होती.एके दिवशी स्वप्नातच रुख्मिणीबाईंनी परवानगी दिली असे गृहीत धरून ते बाहेर पडले आणि तीर्थयात्रा करीत करीत काशीला आले. तेथे रामानंद स्वामींना भेटून आपला संन्यास घेण्याचा मनोदय सांगितला.आणि आपल्या संसाराबद्दल, पत्नीबद्दल काही एक न सांगता संन्याशाची दीक्षा घेतली. आपला पती घर सोडून संन्यास घेण्यासाठी गेला हे कळल्यावर त्या पतिव्रतेला अतोनात दुःख झाले. आणि थोडीथोडकी नव्हे तर तब्बल बारा वर्षे त्यांनी पतीचा विरह सहन केला.ही त्यांची केवढी मोठी तपश्चर्याच होती. पुढे रामानंद स्वामी जेव्हा तीर्थयात्रा करीत आळंदीला आले तेव्हा त्यांना योगायोगाने ही सर्व हकीगत कळाली आणि आपल्या हातून संन्यास घेणारा तरुण म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून या निरपराध रखुमाबाईचा संसार अर्ध्यावर टाकून आलेला विठ्ठलपंत आहे हे त्यांच्या लक्षात आले.आपला दक्षिणेकडील तीर्थस्थळाचा दौरा अर्ध्यावर सोडून ते सिद्धोपंत व रखुमाबाईला घेऊन काशीला परतले. आणि विठ्ठलपंतांना पुन्हा संसार करण्याचा आदेश दिला.गुरुआज्ञाप्रमाण मानून विठ्ठलपंत आळंदीला परत आले. आळंदीला परत आल्यावर विठ्ठलपंताना चार अपत्ये झाली.त्यांची नावेही मोठी सूचक होती. संसारातून निवृत्त झाल्यावर ( निवृत्ती ) ज्ञान प्राप्त होते ( ज्ञानदेव ) आणि पूल दिसतो ( सोपान ) मुक्तीकडे जाणारा ( मुक्ताई ).



## आनंदी पहाट



### माइंडफुलनेसचे महत्त्व

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

माइंडफुल हा शब्द आजच्या लोकप्रिय संस्कृतीत वारंवार वापरला जातो. आपण असे म्हणतो की आपण सजग ध्यानाचा सराव करतो, किंवा आपण आपल्या कृतींमध्ये सजग आहोत, किंवा आपल्याला कसे समजले जाते, याची जाणीव आहे. पण सजग राहणे किंवा माइंडफुलनेसचा सराव करणे म्हणजे नेमके काय? ते आपल्यासाठी महत्त्वाचे का आहे? ते महत्त्वाचे आहे हे आम्ही मान्य करत असल्यास, आम्ही ते वापरून समुदाय तयार करण्यात कशी मदत करू शकतो? आणि आपण ते स्वतःसाठी कसे विकसित करू शकतो? मुळात माइंडफुलनेस म्हणजे विलक्षण क्षणात जगणे होय. आमचे निर्णय आणि गृहितके आमचे शब्द आणि कृती गोंधळात टाकण्याऐवजी, आम्ही सौम्य, प्रेमळ, दयाळू मार्गांनी प्रतिसाद देतो. असे केल्याने, आम्ही चांगले नातेसंबंध निर्माण करतो. इतरांवर प्रभाव टाकण्यासाठी आणि सशक्त समुदाय तयार करण्यासाठी, व्यक्ती म्हणून, सजगतेची सुरुवात आपल्यापासून झाली पाहिजे. माइंडफुलनेस आपल्या शरीर, मन, आत्मा आणि भावनांद्वारे व्यक्त केले जाते. जेव्हा आपण सजग असतो, तेव्हा आपण आपल्या परस्परसंवादात वस्तुनिष्ठ, निर्णय न घेणारा, अ-संरक्षणात्मक आणि अहिंसक असण्याची अधिक शक्यता असते. या भूमिकेद्वारे, आपण इतरांशी अधिक चांगल्या प्रकारे कनेक्ट होऊ शकतो. त्या कनेक्शनद्वारे, अडचणी दूर केल्या जातात, समुदाय तयार होतो, मजबूत होतो, समाजातील सदस्यांमध्ये विश्वास वाढतो. माइंडफुलनेसची सुरुवात वैयक्तिक सराव म्हणून होत असली तरी, जेव्हा सजगता समूह सदस्यांमध्ये सामायिक केली जाते, तेव्हा समुदायाची भरभराट होण्याची अधिक शक्यता असते. जेव्हा त्यांचा वैयक्तिक अजेंडा आणि हेतू सामूहिक उद्दिष्टांशी संरेखित नसतात तेव्हा व्यक्ती जागरूक होतात. जागरुकतेमुळे, व्यक्ती संलग्नक, संरक्षण आणि निर्णय काढून टाकण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या विश्वासांना आव्हान देऊ शकतात.



आधुनिक केसरी

### आता माधुकरी | द्यावी देवा ||

ऐसा लागो छंद | गावे तुझे गुण ||
दिसावा निर्गुण | सगुणात ||१||
आळवावा सूर | आत्मगंधर्वाने ||
नाम संकीर्तने | लीन व्हावे ||२||
आप-पर भाव | निमावा अंतरी ||
पाप पुण्या घरी | दास व्हावे ||३||
सुख-दुःख सारे | पचावे देहाला ||
मन चिंतनाला | मुक्त व्हावे ||४||
होऊनी याचक | आलो तुझ्या दारी ||
आता माधुकरी | द्यावी देवा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

तेणें बहुत दुःख जालें । घरीं आरंधें पडिलें ।
म्हणती आम्हांस कां ठीविलें । देवें वांज करूनी ॥ ३७॥
आम्हांस द्रव्य काये करावें । तें जावें परी अपत्य व्हावें ।
अपत्यालागी त्यजावें । लागेल सर्व ॥ ३८ ॥
वांजपण संदिसें गेलें । तों मरतवांज नांव पडिलें ।
तें न फिटे कांहीं केलें । तेणें दुःखें आक्रंदती ॥ ३९ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सद्‌गुरु ब्रह्म स्वरुप हैं, नियम सत्य उपदेश । सन्त सनातन धम्‌र्म है, गुरुडम्ब नहिं आदेश ।।३०।।(स्वर्वेद पंचम मण्डल पंचम अध्याय)
०५/०५/३०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सद्‌गुरु ब्रह्मस्वरूप आहेत आणि सन्तमत ब्रह्मविद्येचा प्रचार अनादि आहे तसेच तीचा नियम आणि उपदेशही नित्य आहे. म्हणून वेद आणि सद्ग्रंथांमध्ये गुरुसेवेचा जो आदेश आहे ती अंध गुरुभक्ती नाही.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्‌गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## रामदास स्वामी


आधुनिक केसरी



असता न करावा खेद । भक्त जनी ।। नंतर श्रीसमर्थांनी रामनामाचा गजर तीन वेळा एवढ्या मोठ्याने केला कI त्या घोषाने मुहूर्तभरपर्यंत गडावरील सर्व आकाश दुमदुमून गेले. तीन वेळा स्मरण केले । अंबर अवघे गर्जिनले । रामनामे कोंदाटले । जिकडे तिकडे ।। मुहूर्त एक हो गर्जना । गगनी कोंदाटली जाणा । विस्मय पावलो निजजना । प्रेम आले ।।
ध्वनी जाली संपूर्ण । जाहला अवतार हो पूर्ण । देशोदेशी भक्तजन । जाते जाले ।। या प्रकारे श्रीसमर्थांनी 'माघ वद्य नवमी । दिवसा दोन प्रहर नेमी । शनिवारी परंधामी । योग केला ।।[ संदर्भ हवा ]
अंतिम पाच दिवसांमध्ये समर्थांनी अन्नपाणी वर्ज्य केले. त्याच काळात सज्जनगडावर तंजावर येथून श्रीराम पंचायतनाच्या मूर्ती आल्या. समर्थांनी स्वहस्ते त्यांचे पूजन केले. पूर्णपणे एकांतवास स्वीकारला. त्यावेळी त्यांच्याजवळ फक्त उद्धव स्वामी व आक्का बाई होते.

# ज्याच्या घरात समाधान तेथे मी आहे

आधुनिक केसरी



मनुष्य मला भेटला की तो सुखी किती आहे हे मी पाहतो, त्याच्या इतर गोष्टी मी पाहत नाही. पण तुम्ही त्याची श्रीमंती, विद्या, मान यांवरून तो सुखी आहे की नाही हे ठरवता. भगवंतावाचून मनुष्य कसा सुखी होईल ? लोकांना श्रीमंत आवडतो तर मला गरीब आवडतो. लोकांना विद्वान् आवडतो, तर मला अडाणी आवडतो. असे माझे सगळे जगाच्या उलट आहे.
पण म्हणूनच जगाच्या उलट माझ्याजवळ समाधान आहे. समाधान कशात आणि कुठे आहे याचा मी शोध लावला. मी समाधानरूप आहे. ज्याच्या घरात समाधान आहे तिथे मी आहे. जो माझा आहे पण समाधानी नाही, त्याच्याजवळ राहायला मला कष्ट होतात. मी अत्यंत समाधानी आहे, तसे तुम्हीसुद्धा अत्यंत समाधानी राहा की झाले ! आजपर्यंत मी एकच साधन केले : कुणाचे मन दुखवले नाही, आणि एका नामावाचून दुसऱ्या कशाचीही आठवण ठेवली नाही. माझ्याजवळ काय आहे ते सांगा ! विद्या नाही, पैसा नाही, किंवा कला नाही. पण सर्वांवर मी अत्यंत निष्कपट प्रेम करतो, त्यामुळे लोकांना मी हवासा वाटतो आणि त्यांना माझा आधार वाटतो.जगाचा स्वभाव मला पक्का माहीत आहे; म्हणून आजपर्यंत मला कोण काय म्हणतो हे मी पाहिले नाही, मी त्याला काय सांगायचे एवढेच मी पाहिले. माझे सांगणे ऐकल्यावर पुनः तुम्ही ऐकायला येता, याची तीन कारणे असू शकतील. एक, मला चांगले सांगता आले नसेल; दुसरे, तुम्हांला ते समजले नसेल; किंवा तिसरे, सांगितलेले तुम्ही विसरला असाल. तुम्ही माझ्याशी अगदी स्वाभाविक रीतीने बोलावे; आपण आपल्या घरातल्या माणसांशी जसे बोलतो तसे अगदी आपलेपणाने माझ्याशी बोलावे. पण माझ्याशी कुणी कसाही आणि काहीही बोलला तरी मला जे सांगायचे तेच मी त्याला सांगत असतो. मी एखाद्याला सांगत असताना, ' याने माझे ऐकले तर याचे कल्याण होईल ' असे आपोआपच माझ्या मनात येते. माझे जो ऐकेल त्याचे खास कल्याण होईल याची मला खात्री असते. पण कल्याण म्हणजे प्रपंचातली सुधारणा नसून, आहे त्या परिस्थितीमध्ये समाधानाने राहणे होय. माझ्या माणसाच्या प्रपंचाला मी मदत करणार नाही असे नाही; पण त्याचा प्रपंच त्याच्या परमार्थाचा प्राण घेईल इतकी मदत मी करणार नाही. अशी केली नाही तर तो रडेल, त्याची माझ्यावरची श्रद्धा थोडी कमी होईल, पण तो जगेल हे मात्र निश्चित होय; आणि जगल्यावर तो आज ना उद्या नाम घेईल. रोगी मेल्यानंतर त्याला औषध देऊन काय उपयोग आहे ? मी एकदा बीज पेरून ठेवतो, आज ना उद्या त्याचे झाड झाल्याशिवाय राहणार नाही.

## संत ज्ञानेश्वर माऊली

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

परमात्मा पांडूरंगावरच्या अपार भक्तिमूळे त्याला या भक्ताकडे यावे वाटले असणार. अशी ही आपल्या विठूराया ची करणी ज्ञानेश्वरां जवळ म्हणलं तर काय होतं हो ? असं विशेष , की देवालाही त्याच्याकडे यावे वाटले? मित्रांनो ज्ञानयोग कर्मयोग व भक्तियोग या तिन्हींचं एकत्रित मिश्रण म्हणजे आपली माऊली होय. संपूर्ण विश्वाला गवसणी घालणारे "पसायदान" माऊलीने लिहिले. अमृतानुभव,भावार्थदिपीका,ज्ञानेश्वरी ,हरिपाठ की ज्यात 28 पद आहेत. हा हरिपाठ वारकरी सांप्रदायिक घराघरात आजही दररोज म्हणला जातो. आणि नित्य निरंतर मौखिक परंपरेने चालत आलेल्या या हरिपाठा मुळे आजही वारकरी संप्रदाय या जगदीश्वराच्या ठायी नतमस्तक होतो आहे.



संसद हल्ला आणि सुरक्षा गांभीर्य पान ६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, १६ डिसेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# 13 हजारांची लाच मागणारा लिपिक जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**चाळीसगाव :** मन्याड धरणातून गाळ टाकण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता कारण्यासाठी 13 हजार 300 रुपयांची लाच मागणाऱ्या चाळीसगांव पाटबंधारे उपविभागाच्या लिपीकास धुळे विभागाच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून दि 15 रोजी सकाळी 10-40 वाजेच्या सुमारास ताब्यात घेतले आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या उपविभागीय अभियंत्याने 4 लाखाची लाच घेतल्याचे प्रकरण ताजे असतानाच आज पुन्हा हा प्रकार घडल्याने शासकीय पातळीवर चाळीसगाव विभागाचे नाव पुन्हा एकदा खराब झाले आहे.

लाच घेतली की कारवाई होते असे नाही तर लाच मागणाऱ्यावर देखील कारवाई होते हे आजच्या कारवाई वरून दिसून आले आहे.

चाळीसगाव मध्ये एकापाठोपाठ कारवाया होत असल्याने भ्रष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांना धडकी भरली आहे त्यामुळे आता कोणावर कारवाई होणार किंवा एखादा बडा मासा गळाला लागतो का अशी चर्चा जनमाणसांत होत आहे.

वेहेळगांव ता. नांदगांव येथील तक्रारदाराच्या आजोबांच्या शेत जमिनीत मन्याड धरणातुन



गाळ टाकण्यासाठी परवानगी मिळणेकरीता आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन तकारदार व इतर 11 शेतकऱ्यांनी उपविभागीय अभियंता, पाटबंधारे उपविभाग, चाळीसगांव येथे अर्ज केला होता. यासाठी चाळीसगांव पाटबंधारे उपविभाग कार्यालयातील लिपीक तुषार अशोक पाटील हा तकारदार यांना फोन करुन तक्रारदार यांचेकडे 13 हजार 300 रुपये लाचेची मागणीचा तगादा लावला होता. तक्रारदार यांनी वैतागुन त्यांनी केलेल्या लाच मागणीची धुळे लाचलुचपत विभागाकडे दुरध्वनीने माहिती दिली होती. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक धुळे विभागाचे पोलीस उप अधीक्षक अभिषेक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत बेंडाळे, पोलीस निरीक्षक मंजितसिंग चव्हाण, रुपाली खांडवी, हवालदार राजन कदम, मुकेश अहिरे, मकरंद पाटील, प्रशांत बागुल, संतोष पावरा, रामदास बारेला, प्रविण पाटील, प्रविण मोरे, सुधीर मोरे, जगदीश बडगुजर यांनी दि 15 रोजी सापळा रचून सकाळी 10-30 वाजेच्या सुमारास लिपीक तुषार अशोक पाटील विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे. कारवाईस नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे वालावलकर, अपर पोलीस अधीक्षक माधव रेडडी व वाचक पोलीस अधीक्षक नरेंद्र पवार यांचे मार्गदर्शन लाभले गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

# शर्थीचे प्रयत्न करून विद्युत पुरवठा सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील बसस्थानकच्या मुख्य रस्त्यावरील 200 च्या डीपीला (ता. १३) दुपारी चार वाजता आचनक आग



लागल्याने एकच गदारोळ सुरू झाला शहरातील रहदारी सुद्धा रस्त्यावर जाम झाली यात मात्र कुठलीही जिवित हानी झाली नाही या डिपी पासुन दिवस भरातुन हजारो नागरीक ये जा करतात या डिपी आग लागल्याने मोठा अनर्थ टळला मात्र शहरातील लाईट गुल झाल्याने व्यापारी वर्गात नाराजी दिसुन आली सध्या लाईट हा जिवन आवश्यक मानली जात आहे लागलीच महावितरणच्या सपुर्ण टिमने शर्तीचे प्रयत्न करून आग अटोक्यात आनुन विदयुत पुरवठा सुरळीत केल्याने शहरात महावितरणचे कौतुक होत आहे. यावेळी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता भरत खिल्लारे, अभियंता प्रशांत शेटे, लाइनमन अविनाश गायकवाड, ज्ञानेश्वर राठोड, निलेश राठोड, मुजाहिद शेख, राहुल पवार, गोरख राठोड यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग अटोक्यात आणली. तातडीने डिपी बदलुन विदयुत पुरवठा सुरळीत केला.



# वाहतुकीला अडथळा; वाहनधारकांवर खुलताबाद पोलिसांकडून कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथे मुख्य बाजारपेठेत रस्त्यावर वाहने उभी करून वाहतुकीला अडथळा करणाऱ्या वाहनधारकांवर खुलताबाद पोलिसांनी कारवाई केली त्यामुळे संपूर्ण रस्ता आज वाहतुकीसाठी सुरळीत व मोकळा झाला होता. बाजार सावंगी येथे वाहतूक कोंडीची बातमी आधुनिक केसरीने प्रसारित केली होती आणि त्याची दखल घेत आज खुलताबाद पोलिसांनी कारवाई केली. बाजार सावंगी हे मुख्य बाजारपेठेचे गाव असून शुक्रवारी येथे आठवडे बाजार भरतो आणि तीस ते पस्तीस खेडी लागून असल्याने येथे मोठी वर्दळ असते. मात्र बरेचशे वाहनधारक हे आपली वाहने व्यवस्थित बाजूला न लावता रस्त्यावरच मध्येच उभी करतात त्यामुळे या ठिकाणी बऱ्याच वेळा वाहतूक कोंडी होते तर अशा रस्त्यात कुठेही वाहने उभी करणाऱ्या वाहनधारकांवर आज खुलताबाद पोलिसांनी कारवाई केली .पोलिसांनी वाहनधारकांवर कारवाई करताच रस्ता पूर्णपणे मोकळा झाला होता. खुलताबाद पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई राहुल दांडगे तसेच बाजार सावंगी पोलीस चौकीचे बनसोड सपकाळ, होमगार्ड अनिल वाकळे, दिपक वाकळे संतोष पुंड आदींनी वाहन धारकांवर कारवाई केली.

# भुजबळ यांचे निलंबन करा; अन्यथा जलसमाधी : साळुंके, निकम यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापुर :** अन्न व नागरी पुरवठा मंत्री मा.ना. छगन भुजबळ यांना मंत्री पदावरुन निलंबीत करण्यात यावे, आशी मागणी चंद्रशेखर चंद्रकांत साळुंखे, संतोष प्रभाकर निकम यांनी केली आहे. मंत्री छगन भुजबळ हे संविधानीक जबाबदार पदावर असताना मंत्री पदाची शपथ घेतांना कायद्याद्वारे स्थापित झालेल्या आहे अशा भारतीय संविधानाची खरी श्रध्दा व निष्ठ बाळगेल. मी भारतातील सहानुभूता, एकात्मिता, उन्नत राखेल, मी महाराष्ट्राच्या मंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक शुध्द बुध्दीने पार पाडेन व संविधान कायदा याचा सर्व स्तरांच्या लोकांना निःस्वार्थपणे व निष्ठापणे कोणाच्याही विषयी ममतभाव व आकस न बाळगता न्याय वागणूक देईल. मंत्री पदाची शपथ घेऊन लाखो मतदारांच्या भावनांचा खेळ केला. तरी अत्यंत तातडीने मा. ना. छगन भुजबळ यांचे निलंबन करण्यात यावे. छगन भुजबळ यांचे निलंबन न झाल्यास आम्ही अर्जदार जायकवाडी नाथसागर, पैठण येथे दि. १८ डिसेंबर पर्यंत निलंबन न झाल्यास पैठण येथे जलसमाधी घेणार,याची सर्वस्वी जबाबदारी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांची राहिल, असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# कष्टाच्या वाटा मुखपृष्ठाचे विमोचन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्रसिद्ध साहित्यिक



अय्युब पठाण लोहगांवकर यांचा " कष्टाच्या वाटा " हा बाल- किशोर- कुमारासाठीचा बाल कथासंग्रहाच्या मुखपृष्ठाचे नुकतेच मान्यवरांच्या उपस्थितीत विमोचन करण्यात आले. या बाल कथासंग्रहात दर्जेदार व संस्कारात्मक १९ कथांचा समावेश असून या संग्रहाचा संपूर्ण बाज हा ग्रामीण जीवनशैलीवर चितारलेला आहे. या बाल कथासंग्रहाचे मुखपृष्ट व कथेनुसार चित्र हे प्रसिद्ध चित्रकार तथा लेखक सरदार जाधव




यांनी रेखाटले असून संभाजीनगर येथील ताई पब्लिकेशनने हा बालकथासंग्रह प्रकाशित करणार आहे ." कष्टाच्या वाटा " हा बाल कथासंग्रह वाचकांच्या मनावर भुरळ घालणारा कथासंग्रह असून नक्कीच तो वाचकांच्या पसंतीला दाद देणारा आहे. असे कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले आहे.

# लोकदैवत जेजुरी रेल्वेस्थानकावर वंदे भारतला थांबा देण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी :** भारतीय लोकदैवत असलेल्या सांस्कृतिक लोकजत्रा



यात्रा उत्सवांची खंडोबा नगरीं म्हणून देश आणि देशाबाहेर ही ओळखली जात असून देशभरातील विवध राज्यतून मल्हारी मार्तंड, मैलार, मल्लना, मल्लिकार्जुन, विरूपाक्ष, म्हाळसाकांत, खंडेराव, मार्तंडभैरव अशा विविध नांवरूप वेशभूषा भाषानं मधूनही ओळखले जाते याचे सांस्कृतिक आणि कुलधर्म कुलाचाराचे प्रमुख ठिकाण म्हणून देवाच्या जेजुरीत दूर राज्यातून भविक पर्यटक येत असतात जेजुरी रेल्वे स्थानकावरून आता नुकतीच वंन्देभारत नव्याने मुंबई ते कोल्हापूर सुरु होत असून या गाडीला जेजुरी रेल्वे स्थानकात थांबा मिळणे आवश्यक असल्याने राज्यभरातील भाविक भक्तांसह करवीरपीठ शन्कराचार्य, जेजुरी मार्तंड देवसंस्थान ट्रस्ट कमिटी, जेजुरी गुरव पुजारी ग्रामस्थ खान्देकर मानकरी सेवेकरी तसेच जेजुरी रेल्वे प्रवाशी संघटन अध्यक्ष विजय खोमणे, अमोल शेवाळे, सामाजिक कार्यकर्ते गणेश अबणावे, देवस्थान मानकरी सचिन पेशवे, धालेवाडी रंबाईदेवी ट्रस्ट अध्यक्ष हनुमंत काळाने, मुंबई कोळी आगरी खंडोबा भक्त प्रतिनिधी भूपेश पाटील, विवेक केणी राजेंद्र म्हात्रे परमपूज्य दादा महाराज जगताप इत्यादीनी रेल्वेप्रशासनास निवेदन ही दिले आहे. जेजुरी रेल्वे स्थानक राज्यातील आणि राज्य बाहेरील तीर्थक्षेत्र पर्यटनस्थळा इतकेच महत्वाचे असून जेजुरी ओद्योगिक नगरीं देखील असल्याकारणाने व्यापार उद्योग आर्थिकदृष्ट्या महत्वाचे असून या रेल्वेस्थानकाल महत्व प्राप्त झाले आहे. म्हणून मुंबई कोल्हापूर वंन्दे भारत या रेल्वेगाडीस जेजुरीत थाम्बा मिळावा या करिता आणि जेजुरी मार्गांवरून धावणाऱ्या एखाद्या रेल्वे गाडीस महालक्ष्मी, बालाजी, हरिप्रिया अशा नामकरण धर्तीवर जयाद्री एक्सस्प्रेस अथवा, मार्तंडविजय एक्सस्प्रेस सारखे नामकरणची मागणी राज्यभरातील भविकांनी विविध निवेदना द्वारे रेल्वेप्रशासनास केली आहे.

# लोणंद येथे आज व्याख्यानाचे आयोजन


आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** येथील रयत संकुलाच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व माजी केंद्रीय कृषिमंत्री (भारत सरकार) पद्मविभूषण मा. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या ८३ व्या वाढदिवसानिमित्त कृतज्ञता सप्ताह साजरा केला जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून विशेष व्याख्यान शनिवार, दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ०९.३० वाजता न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनि. कॉलेज (मुलींचे) लोणंद येथील प्रांगणात आयोजित करण्यात आले आहे.या समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध साहित्यकार व गीतकार प्रा. प्रवीण दवणे उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्था, सातारा माजी सचिव (उ.शि.), प्राचार्य डॉ.गणेश ठाकूर प्राचार्य महात्मा फुले आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज पनवेल उपस्थित राहणार आहेत.यावेळी निवृत्त निबंधक भागीदारी संस्था, मुंबई मा. अ‍ॅड. सुरेंद्र बोडरे, ज्येष्ठ नेत्र चिकित्सक, लोणंद डॉ.अजित वर्धमाने, जनरल बॉडी सदस्य, र.शि.सं. सातारा व आजीव सदस्य, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मा. मिलिंद माने, माजी सभापती समाजकल्याण जि.प.सातारा आनंदराव शेळके-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे.

## सरकारवर ताशेरे

आधुनिक केसरी

महिला सशक्तीकरणाच्या चर्चा वारंवार होताना दिसतात. मात्र, अद्याप महिलांवर होणारे अत्याचार, महिलांविरोधातील गुन्हे कमी होताना दिसत नाहीत. बेळगावमधल्या अशाच एका प्रकरणामुळे ही बाबत तीव्रतेनं अधोरेखित झाल्याचं दिसून आलं. कर्नाटक उच्च न्यायालयाने बेळगावमध्ये घडलेल्या या प्रकरणाची स्वत: दखल घेऊन (स्यूमोटो) कर्नाटक सरकार व पोलिसांची कानउघाडणी केली. तसेच, इतक्या हीन पद्धतीने महिलांना वागणूक मिळत असताना पोलीस कुठे होते? असा सवालही न्यायालयाने उपस्थित केला आहे. बेळगावमध्ये ११ डिसेंबर रोजी एक तरुणी आपल्या साखरपुड्याच्या दिवशी त्याच गावात राहणाऱ्या तिच्या प्रियकरासमवेत पळून गेली. याचा राग तरुणीच्या कुटुंबीयांना आल्यानंतर त्यांनी थेट त्या तरुणाच्या घरी धाव घेतली. त्याच्या आईला बेदम मारहाण केली. तसेच, या महिलेची नग्नावस्थेच धिंड काढून तिला एका विजेच्या खांबाला तब्बल दोन तास बांधून ठेवण्यात आलं. या प्रकरणामुळे बेळगावमध्ये खळबळ उडाली आहे. या घटनेची उच्च न्यायालयाने दखल घेत प्रशासन व्यवस्थेला परखड शब्दांत सुनावले आहे. कर्नाटक उच्च न्यायालयाने मुख्य न्यायमूर्ती प्रसन्ना वराले आणि न्यायमूर्ती कृष्णा दीक्षित यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने संतप्त टिप्पणी करत पोलीस यंत्रणेवर ताशेरे ओढले. "अशा घटनांनंतर देशाच्या इतर महिलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असेल. असा प्रकार महाभारतातही घडला नव्हता. द्रौपदीसाठी भगवान कृष्ण धावून आले होते. पण सध्याच्या आधुनिक युगामध्ये तिच्या मदतीसा कुणीही धावून आलं नाही. दुर्दैवाने हे जग दुर्योधन व दु:शासनांचं आहे", अशा शब्दांत न्यायमूर्तींनी आपला उद्वेग व्यक्त केला. दरम्यान, आधी मारहाण, नंतर नग्न धिंड काढल्यानंतर या महिलेला दोन तास वीजेच्या खांबाला बांधून ठेवण्यात आले. यावरून न्यायालयाने संताप व्यक्त केला. त्या महिलेला त्या दानवांच्या दयेवर सोडून देण्यात आले होते. कल्पना करा त्या महिलेला या सगळ्याचा किती मोठा धक्का बसला असेल. आपण जोपर्यंत त्या महिलेच्या जागी स्वत:ला ठेवत नाही, तोपर्यंत आपल्याला हे जाणवणार नाही. आरोपींना माणूस म्हणायची मला लाज वाटतेय. कुणी इतकं क्रूर कसं होऊ शकतं?" असा उद्विग्न सवाल न्यायालयाने यावेळी केला. या प्रकरणाची गंभीर दखल घेत न्यायालयाने पोलिसांना फटकारलं. पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यासाठी दोन तास का लागले? असा सवालही न्यायालयाने केला. यासंदर्भात थेट पोलीस आयुक्तांना न्यायालयासमोर या घटनेचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, हे प्रकरण अत्यंत कठोरपणे हाताळले जाईल, असा सज्जड दम न्यायालयाने प्रशासन व आरोपींना दिला.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

## अजितदादा पीएचडीचं महत्त्व समजून घ्या हो

आधुनिक केसरी

**सध्या नागपुर येथे राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे.विरोधी पक्ष सरकारला विविध प्रश्न विचारत आहे व समस्या मांडत आहे..अशातच सारथीसारख्या संस्थेच्या माध्यमातून मराठा विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सुविधा कशा पुरवता येतील यावर विधान परिषदेत चर्चा झाली. काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी विधान परिषदेत म्हणाले, "सारथीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पीएचडी करण्यासाठी फेलोशिप दिली जाते. परंतु केवळ २०० विद्यार्थ्यांनाच ही शिष्यवृत्ती दिली जाईल, असा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे. ही संख्या वाढवण्यात यावी.**

सतेज पाटील यांची मागणी ऐकताच उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, पीएचडी करून ही पोरं काय दिवे लावणार आहेत? अजित पवारांच्या या धक्कादायक वक्तव्याचं सतेज पाटलांसह अनेकांना आश्चर्य वाटलं.

अजिदादा नेहमीच धक्कादायक वक्तव्य करतात.ते नेहमीच चर्चेत असतात..कधी ते सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनावर बोलतात तर कधी लघु शंकेवर बोलतात. आता तर त्यांनी भर सभागृहात पीचडी वर बोलून पुन्हा एकदा विद्यार्थ्यांचा रोष ओढवून घेतला. राज्यकर्त्यांनी तोलून मोलून बोलले पाहिजे.. आपण जनतेचे प्रतिनिधी आहोत याचे भान ठेवायला पाहिजे. सरकारकडून जनता अपेक्षा ठेवत असते.विद्यार्थ्यांचा जेव्हा प्रश्न व समस्या समोर येतात निदान तेव्हा तरी विद्यार्थ्यांना अनुकूल असे निर्णय घेणारे वक्तव्य केले पाहिजे..विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. कारण शिक्षणा मुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होत असते.विद्यार्थी उद्याचे , भविष्याचे नागरिक आहेत.ते देशाचे उद्गाते आहेत..उद्याचा भारत त्यांना घडवायचा आहे.. तेव्हां विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी अधिकाधिक शैक्षणिक सोयी ऊपलब्ध करून देणे हे सरकारचे कार्य आहे..विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असेल तर त्यांना शिष्यवृत्ती मिळेल अशा.सोयी व उपलब्ध करून देणे, विदेश शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.,संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती,संशोधनास मदत करणे या शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे ही जबाबदारी सरकारची आहे.असे असताना मात्र अजित पवारांनी पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत बेजबाबदार वक्तव्य करून त्यांचे पाय मागे ओढण्याचा प्रकार केलेला आहे.अजितदादांनी उच्च शिक्षण अर्थात पीएचडी चे महत्व समजून घेण्याची गरज आहे.नवीन शोधांना जन्म देणे आणि विविध विषयांचे सखोल ज्ञान मिळवून ते सर्वांना उपलब्ध करून देणे हा पीएचडीचा मूळ उद्देश आहे. कोणताही शिक्षक संशोधनाच्या प्रक्रियेपासून आणि नवीन आणि सतत ज्ञान प्राप्त करण्यापासून स्वतःला वेगळे करू शकत नाही. २०१८ मध्ये,यूजीसीने ने विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेश-स्तरीय पदांवर भरतीसाठी निकष लावले आहेत.पीएचडी ही एक शैक्षणिक पदवी आहे जी संशोधन, डेटा विश्लेषण आणि सिद्धांताचे मूल्यमापन यावर लक्ष केंद्रित करते.पीएचडी पदवी विद्यार्थ्यांना निवडलेल्या क्षेत्रात किंवा विषयात स्वतंत्रपणे संशोधन करण्याची संधी देते. सोप्या शब्दात, पीएचडी करणे म्हणजे नवीन ज्ञान मिळवणे, नवीन गोष्टी समजून घेणे आणि नवीन कौशल्ये तयार करणे. पीएचडी.अर्थात डॉक्टरेट ही संशोधन क्षेत्राशी संबंधित पदवी आहे. तसेच, हे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्राप्तीच्या सर्वोच्च स्तरांपैकी एक मानले जाते. शिवाय, पदवी पूर्ण करण्यासाठी तीन ते चार वर्षे लागतात.



पदवीपेक्षा पीएचडीला अधिक महत्त्व आहे, कारण यामध्ये प्रशिक्षण आणि ज्ञानावर आधारित संशोधन कार्यांना अधिक महत्त्व दिले जाते.पीएचडी हे एक संशोधन कौशल्य आहे ज्यामध्ये समस्यांचे उत्कृष्ट आकलन, गहन संशोधन कार्य आणि अत्यंत विशिष्ट विश्लेषणात्मक आणि निरीक्षण कौशल्यांसह महत्त्वपूर्ण समस्या सोडविण्याची क्षमता समाविष्ट आहे.पीएचडी पदवीधरांसाठी शैक्षणिक क्षेत्र ही पहिली पसंती बनली आहे कारण येथे त्यांना कामाच्या पूर्ण स्वातंत्र्यासोबतच खूप चांगले वेतन पॅकेज मिळते. बहुतेक प्रकरणांमध्ये, शैक्षणिक क्षेत्रातील नोकऱ्यांमध्ये मोफत निवास यासारख्या इतर अनेक फायद्यांचा समावेश होतो. पीएचडी पदवीधारकांना दुसऱ्या देशात काम करण्याची संधीही आहे. एकूणच, पीएचडी उमेदवारांची नियुक्ती करताना, बहुतेक संस्था त्यांच्या संभाव्य उमेदवारांना उत्कृष्ट विश्लेषणात्मक कौशल्ये आणि जटिल समस्यांचे द्रुतपणे निराकरण करण्याची क्षमता शोधतात.

पीएचडी केल्यानंतर विद्यापीठात प्रोफेसर होता येते. यानंतर औद्योगिक R&D लॅब व्यावसायिक आणि स्टार्ट-अप मार्गदर्शक बनतं येते.औद्योगिक संशोधन आणि विकास संस्थांनी पीएचडी गट समर्पित केले आहेत जे संशोधन क्रियाकलाप करतात आणि नवीन उत्पादने डिझाइन करतात, तसेच महत्त्वाच्या धोरणात्मक बैठकांमध्ये भाग घेतात. विकास केंद्रांच्या तुलनेत, औद्योगिक संशोधन आणि विकास प्रयोगशाळांचे सरासरी पगार खूप चांगले आहेत. हे दर्शविते की ५ वर्षांचा अनुभव असलेल्या अभियांत्रिकी पदवीधराला औद्योगिक R&D लॅबमध्ये नुकतेच सामील झालेल्या नवीन पीएचडी पदवीधरापेक्षा कमी पगार मिळतो.अनेक ठिकाणी विकास केंद्रे पीएचडी पदवीधरांना विविध कामांसाठी नियुक्त करतात, परंतु त्यांचे पगार विशेष R&D पेक्षा समान किंवा किंचित जास्त आहेत. संशोधन प्रयोगशाळेत किंवा विकास केंद्रात सहभागी होणाऱ्या पीएचडी पदवीधराची पगार रचना आणि पदनाम इतर कोणत्याही पदवीधरांपेक्षा नेहमीच जास्त असते.

स्टार्ट अप्सच्या आगमनाने संपूर्ण पीएचडी वातावरणच बदलून गेले आहे. काही काळापूर्वीपर्यंत पीएचडीची व्याप्ती केवळ शैक्षणिक क्षेत्रापुरती मर्यादित होती. पण आज शैक्षणिक क्षेत्र आणि स्टार्ट-अप्स यांच्या संयोगाने पीएचडी पदवीधारकांना अनेक नवीन पर्याय उपलब्ध झाले आहेत. स्टार्ट-अप्स हे नावीन्य आणि सुधारणेचे भांडार बनले असल्याने, पीएचडी पदवीधरांना त्यांच्या ज्ञान-आधारित कौशल्यांचा फायदा घेण्यासाठी नवीन आणि वाढत्या संस्थेमध्ये काम करायचे आहे जेणेकरून ते त्यांच्या अपवादात्मक संशोधन आणि विकास क्षमतांद्वारे नवीन उत्पादने डिझाइन करू शकतील. आजकाल, पीएचडी पदवीधर शोधत आहेत. स्टार्ट-अप वातावरणात काम करा जेणेकरुन त्यांना कामाचा चांगला अनुभव मिळू शकेल आणि नंतर ते शैक्षणिक क्षेत्रात सामील होऊ शकतील जेथे ते त्यांचे कौशल्य आणि कौशल्य उत्पादकपणे वापरू शकतील.

आर्थिक क्षेत्रापासून सार्वजनिक क्षेत्रापर्यंत, पीएचडी उमेदवार आजकाल सर्वत्र उपस्थित आहेत कारण ते आता केवळ शैक्षणिक क्षेत्रात काम करण्यापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. आजकाल, पीएचडी पूर्ण केल्यानंतर, व्यावसायिकांना त्यांच्या कौशल्यांचा सर्वोत्तम वापर करण्यासाठी कॉर्पोरेट वातावरणात शैक्षणिक संशोधन क्षेत्रात काम करायचे आहे. बँकिंग क्षेत्रात काम करायचे असेल तर तुमच्याकडे वित्त विषयात पीएचडी पदवी असणे आवश्यक आहे. हे महत्त्वाचे आहे कारण शैक्षणिक संशोधनामुळे झालेला बदल अभ्यासाच्या क्षेत्रापेक्षा खूप पुढे जाऊ शकतो.




गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## बदलत्या शाळेतील छडीसोबत विद्या गायब

आधुनिक केसरी

**छडी हे शिस्तीचं प्रतिक होतं पण हिचं शिस्त काळाबरोबर कालबाह्य झाली शिस्त संपल्यावर स्वंय शिस्त असेल तर हि उणीव भरून निघेल पण स्वंय शिस्त पाहिजे तशी वृद्धिंगत झाली नाही आणि छडीही गायब झाली मग विद्या मिळणार कशी विना शिस्त विद्या मिळण थोडं कठिण असतं.बदलत्या शाळेतील छडी गायब झाली आणि त्या सोबत विद्येची गोडी देखिल कमी झाली हे वास्तव नाकारता येणार नाही.एक काळ छडी हे शाळेचं वैशिष्ट्य होत. बदलत्या शाळेत छडी शिस्त गायब असून आधुनिकतेच्या नावाखाली दफ्तराच प्रचंड मोठ ओझ वाढून ते जवळपास मुलांच्या वजना इतकंच झालं आहे.**

शिक्षण शाळा व गुरूजी यांच्या बद्दल मनात असणारा आदरभाव हा दिवसेंदिवस कमी होतं असताना जीवन घडविणारे गुरुजी हे वंदनीय पुजनीय असतात हा भाव लोप पावत चालला आहे याचे दुष्परिणाम मग दिसणारच. वंदनीय गुरूजी बद्दल असणारी विद्यार्थ्यांनच्या मनातील आदरयुक्त भिती हि आज जशी जशी कमी होतेय तसं तसं नुकसान हे विद्यार्थी यांचं होत आहे. शाळेतील छडी म्हणजे अशी फार काही मोठी कठिण सजा नव्हती.पण शिस्त आणि शिक्षणाची गोडी लागण्यासाठी जो आदर युक्त प्रसाद शाळेत मिळायाचा त्याबद्दल त्या काळी प्रत्येक विद्यार्थ्याला खुप आदर होता . आजकाल मुलं थोडी सैराट झाली आहेत हे कोणालाही ऐकायला योग्य वाटणार नाही पण हे सत्य नाकारून चालणार नाही. मुलांचा स्वभाव हा दिवसेंदिवस बदलतं चालला आहे.शिक्षणा च्या प्रति गोडी कमी होत चालली आहे.शिक्षणाच्या संदर्भात असणारा भाव आणि आदर हा पण लोप पावत चाललंय उगाच पालक पाठवतात म्हणून शाळेत जातोय असं एकंदरीत मनस्थिती हि बहुतांश मुलांची विद्यार्थ्यांनची आहे. पण स्वतःचं जीवन घडविण्यासाठी देशाच राज्याचं समाजाचं भविष्य घडविण्यासाठी आपण शिकल पाहिजे आपण भविष्यातील आधारस्तंभ आहोत हेच मुलं दिवसेंदिवस विसरत चालले आहेत.हे खुप घातक आणि अहितकारक आहे.जसं जसं आपण पुढे जातोय तसं तसं शिक्षणाच्या बाबतीत दृष्टी आणि दृष्टीकोन बदलतोय. ज्ञान,बुद्धी,हुशारी आणि शैक्षणिक पदवी ह्या सगळ्या भिन्न बाबी आहेत. पदवी मिळाली म्हणजे ज्ञान,बुद्धी, हुशारी,येईलच



असं होतं नाही. आपण लहान असताना आपले आजोबा पजोबां व्यवहारिक हिशोब करण्या मध्ये आजही आपल्या पेक्षा तरबेज अचुक आहेत हे सत्य आहे.त्यांच्या मनात शिक्षणाच्या बद्दल गुरूजी बदल जो आदर होता तो आदर त्यांना घडविण्यासाठी पुरेसा ठरला आज तो आदरच गायब आहे.छडी लागे छम छम विद्या येई घम एकेकाळी हे घोष वाक्य होतं पण सध्या इतिहास जमा झाले आहे. वर्गनिहाय वेगळ्या तसिकांना वेगवेगळे गुरूजी व वेगवेगळ्या पद्धतीच्या छड्या हे शाळेचं वैशिष्ट्य असायचं.गुरूजी यांनी छडीने मार दिल्यावर अंगावर वळ उमटले तरी गुरूजी बदल अनादर कधीच वाटत नसे त्या मार देण्यात सुद्धा सात्विक आपुलकी होती आपलेपणा होता .म्हणून मार मिळाला तरी शाळेची शिक्षणाची गोडी कमी होत नव्हती पण आज शिक्षण क्षेत्रात ज्या गतीने बदल होताय ते बदल कौतुकास्पद आहेत पण नेमकं मुलं याकडे सकारात्मक न पाहता टाईमपास म्हणून शिकतायत का ?असं कधी कधी शैक्षणिक परिसरातील वातावरण मुलांची वर्तणूक पाहून वाटतं कारण शिक्षण घेणं हा मुख्य उद्देश बाजूला पडतोय आणि छेडछाड गुंडागिरी गुंडागर्दी , आणखी काही वेगळे प्रकार हे सगळं चित्र आपल्या डोळ्यासमोर पाहण्यासारख सुद्धा नाही एवढी विचित्र परिस्थिती निर्माण होत आहे. मग शिक्षण हा मुख्य उद्देश व हेतु तर बाजूला पडतोय का आणि बहुतांश मुल नको असलेल्या बाबींना आपल्या जीवनात प्रवेश देऊन दिशाहीन होत आहेत यामध्ये छडी गायब झाली हि बाब खुप महत्वाची आहे शिक्षण आणि जीवन ह्या समांतर बाबी आहेत शिक्षणाची दिशा चुकली तर जीवनाची दिशा चुकते म्हणून योग्य वेळी शिक्षणाच्या बाबतीत समर्पित भावनेने वागल पाहिजे आणि शिक्षण हेच जीवनातील परिवर्तनाचं माध्यम आहे याची जाणीव जागृती असली पाहिजे आणि शिक्षण घेत असताना त्याच भावनेने पाहिलं पाहिजे.शिक्षण हे जीवन परिवर्तनाच साधनं असुन त्या विषयी नेहमी आदर पुर्वक आचरण करून अनुकरण केल पाहिजे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# खुलताबाद बसस्टँडवर मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** येथे खुलताबाद शहर बसस्टँडवर आवारा कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असुण प्रशासनाने याच बंदोबस्त करावी अशी मागणी शहरी नागरिकांकडून होत आहे.
स्टँड वर प्रवासी नसतात त्यापेक्षा अधिकचे आवारा कुत्रे तेथे धुमाकूळ घालतांना दिसून येतात सद्या ठिकठिकाणी आवारा कुत्र्यांचे एका पेक्षा एक किस्से प्रकार ऐकण्यासाठी मिळत आहे. वहानामागे धावणे दुचाकीला आडवे होवून पाडणे, पिछा करणे, लहाने मुलांवर हल्ला करणे, लहान गुरांना डसने पकडणे पाडणे हल्ला करणे, चलत असलेल्या नागरिकाला भुंकणे धावुन जाणे किंवा पकडणे असे अनेक प्रकार घडत आहे व मोठ्या संख्येने आवारा कुत्रे टोळक्य टोळक्याने भटकंती करत आहे.यामुळे महिला, लहान मुले, आजारी नागरिक यांच्यात भितीचे वातावरण आहे. प्रशासनाने तातडीने बंदोबस्त करावा असी मागणी शहरी नागरिकांतून होत आहे.

# रेल येथे पालकांनी घेतला क्रीडा स्पर्धेचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**रेल :** मुख्यकार्यकारी अधिकारी विकास मीना उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुदर्शन तुपे शिक्षण अधिकारी प्राथमिक विभाग जयश्री चव्हाण गटशिक्षणाधिकारी सुनीता कुलकर्णी वेरूळकर यांच्या संकल्पनेतून पालकांच्या क्रीडा स्पर्धा घेण्यात याव्यात असे आदेश देण्यात आले होते त्या नुसार आज दिनांक 15-12-2023 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रेल केंद्र कन्नड ता कन्नड येथे पालक क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करून पालकांनी घेतला क्रीडा स्पर्धेचा आनंद देखील घेतला. या वेळी केंद्रप्रमुख दिलीप गायकवाड ग्रामपंचायत सदस्य ललित गायकवाड शालेय व्यस्थापन समितीचे अध्यक्ष भाग्यश्री थेटे उपाध्यक्ष सुशीला दिवेकर शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे व तालुका क्रीडा समिती संयोजक व्यवस्थापन समिती सदस्य परवेज बागवान जानकी थेटे व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत रस्सीखेच या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धा पुढील तीन दिवस चालणार असून स्पर्धेत कब्बडी खो खो क्रिकेट लिंबू चमचा संगीत खुर्ची व वयक्तिक स्पर्धा होणार आहेत शाळा स्तरावर विजेत्या स्पर्दकांची स्पर्धा केंद्र स्तरावर घेण्यात येणार आहेत सादर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शाळा हे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे तथा तालुका क्रीडा संकुल समिती चे संयोजक यांनी उत्कृष्ट नियोजन करून आजची स्पर्धा पार पडली. व पुढील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक सुधाकर ढाकणे, वैशाली बोरसे सहकार्य करत आहे.



# पक्षी अभयारण्य परिसरात सौर ऊर्जा प्रकल्पास परवानगी नाही

## प्रधान मुख्य वनसंरक्षक एस.जी. टेंभुर्णीकर

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जायकवाडी धरणातील पक्षी अभयारण्याच्या परिसरातील जागेवर सौर ऊर्जा प्रकल्पास परवानगी दिली जाणार नाही असे आश्वासन वन विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स महाराष्ट्र राज्य नागपूर एस.जी.टेंभुर्णीकर यांनी कहार समाज संघ महाराष्ट्र राज्य च्या शिष्टमंडळास १२ डिसेंबर मंगळवारी रोजी दिले. यावेळी त्यांना कहार समाज संघ महाराष्ट्र राज्य तर्फे सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्यात यावा अशा मागणीचे निवेदन देण्यात आले.
जायकवाडी धरणातील पाण्यावर फ्लोटिंग सौर ऊर्जा प्रकल्प (तरंगता सौर ऊर्जा) प्रकल्प उभारण्याचा प्रयत्न सुरु आहे. यासाठी गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाने नॅशनल थर्मल पावर कॉर्पोरेशन या पथकाला सर्वे करण्यासाठी परवानगी दिली आहे त्या पथकाने सर्वे पूर्ण केला आहे.या सर्वे नंतर संभाजीनगर, अहमदनगर जिल्ह्यातील चार तालुक्यातील मच्छीमार जागृत झाले. या प्रकल्पास दोन्ही जिल्ह्यातील मासेमारी करणारे कहार, भिल्ल, भोई तसेच इतर समाजाच्या नागरिकांनी प्रचंड विरोध केला . या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे मासेमारी बंद करण्यात येणार आहे त्यामुळे लाखों मच्छीमारावर उपासमारीचे संकट कोसळणार आहे.
हा सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्यात यावा या मागणीसाठी मराठवाड्यातील व पश्चिम महाराष्ट्रातील मच्छीमारा तर्फे पैठण तहसील कार्यालयावर प्रचंड मोर्चा काढण्यात आला होता.यानंतर ०७ व ०८ डिसेंबर२०२३ गुरुवारी, शुक्रवारी रोजी पैठण येथे कहार ,समाज भिल्ल व इतर समाजाच्या ७६ नागरिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर तसेच नेवासा येथे कहार समाज संघ महाराष्ट्र राज्य नेवासा यांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यातआले. पाटबंधारे विभागातर्फे कार्यकारी अभियंता प्रशांत जाधव यांनी कहार समाज संघ महाराष्ट्र राज्य नेवासा व कहार समाज पंच कमेटी पैठण च्या उपोषणकर्त्यांना सदरील सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येईल असे लेखी उत्तर दिले असल्याने एक महिनाभर उपोषण स्थगित करण्यात आले. सदरील प्रकल्प रद्द करण्यात यावा या मागणीसाठी कहार समाज पंच कमेटी व कहार समाज संघ महाराष्ट्र राज्य च्या वतीने तहसीलदार पासून राष्ट्रपती, पंतप्रधान पर्यंत निवेदन देण्यात आले. नागपूर येथे कहार समाज संघ महाराष्ट्र राज्य चे जिल्हाध्यक्ष रघुनाथ इच्छैय्या यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी १२ डिसेंबर रोजी नागपुर येथील वन भवन येथे कहार समाजाचे जिल्हा अध्यक्ष रघुनाथ इच्छैय्या, रमेश लिंबोरे, ॲड.रमेश गव्हाणे, मोतीलाल घुंगासे, योगेश गव्हाणे, गणेश भंडारे या शिष्टमंडळाने वन विभागाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक हेड ऑफ फॉरेस्ट फोर्स महाराष्ट्र राज्य नागपूर एस.जी. टेंभुर्णीकर यांची भेट घेऊन त्यांच्यासोबत जायकवाडी येथील सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्या संदर्भात सविस्तर चर्चा केली. यावेळी एस.जी. टेंभुर्णीकर यांनी सांगीतले की जायकवाडी जलाशयावर पक्षी अभयारण्य आहे. पक्षी अभयारण्यच्या परिसरातील जागेवर सौर ऊर्जा प्रकल्पाला आमच्या विभागामार्फत कोणत्याही प्रकारची परवानगी दिली जाणार नाही. सदरील सौर ऊर्जा प्रकल्पा संदर्भाचा प्रस्ताव आमच्या कोणत्याही विभागाकडे अद्याप पर्यंत आला नसल्याचे त्यांनी शिष्टमंडळाची बोलताना सांगितले.



# जिल्हा अध्यक्षपदी राजू कोरटेंची निवड



आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजीत पवार गट) चित्रपट, साहित्य, कला व सांस्कृतिक विभागाच्या नांदेड जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. मागील अनेक वर्षांपासून कोरटे हे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याची दखल घेऊन उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेश अध्यक्ष सूनील तटकरे व बाबासाहेब पाटील यांनी त्याची निवड केल्याचे लेखीपत्र दिले आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# उपाहारगृहातील कामगारांना मारहाण

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** एनडीए रस्त्यावर कोयता गँगने दहशत माजविल्याची घटना घडली. उपहारगृहात काम करणाऱ्या दोन कामगारांना टोळक्याने मारहाण केली. याप्रकरणी उत्तमनगर पोलिसांनी तिघांना अटक केली. प्रसन्न उर्फ बाळा मनोज कदम (वय २३, रा. शांतीबन सोसायटी, शिवणे), आदित्य उद्धव पांचाळ (वय १९, रा. राहुलनगर, शिवणे), सनी रामप्रताप गुप्ता (वय २१, रा. समर्थ आंगण सोसायटी, शिवणे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत अमर राजेंद्र घारे (रा. स्वरा हाईट्स, अहिरे गाव, वारजे) यांनी उत्तमनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.
घारे यांचे उपहारगृह आहे. त्यांच्या उपहारगृहातील कामगार रुपेश आणि रमेश दुचाकीवरुन एनडीए रस्त्याने निघाले होते. शिवणे परिसरात आरोपी कदम, पांचाळ आणि गुप्ता यांनी दोघांना अडवले आणि शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. मी या भागातील दादा आहे. बाजूला चल मी तुला दाखवितो, अशी धमकी कदमने दोघांना दिली. कदमने त्याच्याकडील कोयता उगारुन मारहाण करण्यास सुरुवात केली.



# संसद हल्ला आणि सुरक्षा गांभीर्य



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**संसद हे असे ठिकाण आहे कि जेथुन संपूर्ण देशातील प्रत्येक नागरिकांचे हित व संरक्षण केले जाते. परंतु संसदेमध्येच अतिरेकी घुसुन हल्ला करत असतील तर खुप मोठा प्रश्न वेगवेगळ्या बाजुने उभे राहतात. संसद देशातील सर्वात सुरक्षित आहे. जर तेथे घुसखोरी होऊन हल्ला होऊ शकतो तर देशातील इतर ठिकाणचे आणि सर्वसामान्य जनतेचे संरक्षणाचा प्रश्न उपस्थित राहतो. मुळात सर्वात महत्वाचा प्रश्न हा आहे की संसदेमध्ये घुसखोरी करून अश्रुधुर सोडणारे दहशतवादी पकडल्याने आंतरराष्ट्रीय बातमी होऊन देशाची सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आला.**

परंतु आंतरराष्ट्रीय बातमीचे गांभीर्य व तिव्रता कमी करून जस काय एखाद्या सार्वजनिक ठिकाणी काही घडले अशा प्रकारचे वृत्त प्रस्थापित स्ट्रीम मिडिया देऊन संसदेत जाऊन दहशत निर्माण करणाऱ्या कृत्याला सर्वसाधारण कृत्याप्रमाणे मांडताना दिसत आहेत. देशाच्या सुरक्षा व्यवस्थेला आव्हान करून आणि करोडो जनतेचे लोकप्रतिनिधी असलेल्या ठिकाणी जाऊन दहशत निर्माण करणे याला दहशतवादी कृत्यच म्हणत असतात. शेतकरी आंदोलन, विद्यार्थी आंदोलन, वैचारिक संमेलने यांचा थेट संबध नक्षलवादी व परकिय शक्तीशी दाखवून न्यायासाठी आणि जनतेच्या हितासाठी रस्त्यावर आलेल्या लोकांवर देशद्रोहाचे खटले भरून त्यांना दहशतवादी संबोधले जाते आणि संसदेवर हल्ला करणाऱ्यांना आरोपी माणले जाते. यामुळे स्ट्रीम इलेक्ट्रॉनिक मिडियाची वैचारिक दिवाळखोरी लक्षात येते. गंभीर विषयाला सौम्य रुप देऊन गंभीर विषय दाबण्याचे काम हा मिडिया करून लोकशाहीच्या हत्येमागे मिडीयाचा सुद्धां खुप मोठा वाटा आहे. प्रेम प्रकरणाला झालेल्या गुन्ह्याला लवजिहाद चे स्वरूप देऊन त्यावर ओढून ताढून चर्चा घडवून आणुन दोन समुहात वाद व व्देष पसरणारा मिडिया देशाच्या संसदेवर हल्ला होताना, देशाच्या सुरक्षा यंत्रणेला दहशतवादी शक्तीकडून आव्हान देताना गप्प राहतो, त्यावर कोणतीही चर्चा घडवून आणली जात नाही तेव्हा लक्षात येते इलेक्ट्रॉनिक्स मिडीया जनतेचा आवाज उठलणारा नाही तर तो पक्षाचा अजेंडा चालवणारा मिडीया आहे. दहशतवादी कृत्याला सौम्य रुप देऊन बाजु कमकुवत करणे हे राष्ट्रहितासाठी खुप घातक असते. दुसरी आश्चर्याची बाब म्हणजे पकडले गेलेले दहशतवादी या मध्ये एकही मुस्लिम नाव नाही. जर यामध्ये एक जरी मुस्लिम नाव असते तर स्ट्रीम मिडियाने ओरडून ओरडून मुस्लिमांना बदनाम केले असते. मुस्लिमांना दहशतवादी, व इतर देशाशी संबधीत समजून संसद हल्ला प्रकरण किमान महिनाभर तापवून धरले असते. संसदेवरचा हल्ला खरोखरच माणसाची झोप उडवणारा आहे. चिंतेचा विषय आहे. परंतु मिडीया ने सौम्य बाजु मांडल्याने लोकांना त्यांचे गांभीर्य नाही. जर मिडीया ने ओरडून ओरडून सांगितले असते. देश धोक्यात आहे, संसदेवर हल्ला झाला, आणि हल्लेखोर मुस्लिम असते तर या हल्याचा निषेध गावागावात झाला असता. दहशतवाद्यांना तात्काळ शिक्षा व्हावी म्हणून आंदोलने झाली असती. लोकांना देश व देशातील जनता असुरक्षित वाटायला लागली असती. परंतु मिडीया ला विषय गांभीर्याने घेण्यासाठी मुद्दाच सापडत नाही. मागे रेल्वे अपघातात बाजूला मशीद दाखवून रेल्वे अपघात झाल्याच्या द्वेषात्मक बातम्या पसरवणारे लोक, सोशल मिडिया युझर्स यांना संसदेवरील दहशतवादी हल्ला कोणी केला यावर बोलु वाटत नसणे म्हणजे देशात कृत्य काय घडले यावरून गांभीर्य ठरत नाही तर कोणी घडवून आणले म्हणजे जात बघुन गांभीर्य ठरवले जाते. संसदेच्या आवारात विनापरवाना पक्षीही उडू शकत नाही. तरीही दहशतवादी हल्लेखोर संसदेमध्ये जातात कसे हा खुप मोठा आणि गंभीर प्रश्न आहे. आणि या प्रश्नावर चर्चा होणे आवश्यक आहे. दहशतवादी कृत्य करणाऱ्या तरुणांना संसदेमध्ये जाण्याची पास आहे ती पास जर मुस्लिम खासदार किंवा इतर पक्षाच्या खासदारांनी दिली असती तर त्यांचा संबध थेट दहशतवादी संघटनेशी जोडून संपूर्ण देश कसा धोक्यात आहे असे दाखवले गेले असते. परंतु या प्रकरणात दहशतवादी कृत्य करणाऱ्यांकडे सत्ताधारी खासदारांनी पास दिल्याचे निष्पन्न झाल्याने त्यावर स्ट्रीम मिडीया बोलायला तयार नाही. काही दिवसापुर्वी कॉंग्रेस खासदारांच्या घरी इडी ने छापा टाकून भ्रष्टाचाराच्या माध्यमातून लोकांना लुटून जमवलेले करोडो रूपयांची रक्कम पकडली. तेव्हा इडीने केलेल्या कारवाई मध्ये ज्या भ्रष्टाचारी खासदारांबाबत देशाच्या प्रधानमंत्री यांनी एक वक्तव्य केले होते ते म्हणजे जास्त पैसा कमवायचा असेल तर कॉंग्रेस मध्ये जावे. मग प्रधानमंत्री यांनी केलेले तेच वक्तव्य संसद हल्याला लागु होणार का? ज्यांना संसदेवर हल्ला करायचा त्यांनी भाजपा खासदारांना भेटावे असे म्हणले तर चुक काय? हेच बिजेपी वाले विरोधी पक्षातील नेत्यांना एखाद्या आरोपी सोबत फोटो असले तर त्यांना ट्रोल करून कारवाईची मागणी करत होते. परंतु दहशतवादी कृत्य करणाऱ्यांना पास देणाऱ्या खासदारांची पक्षातून हकालपट्टी करून योग्य ती चौकशी करून त्यांच्या वर दहशतवादी कृत्याला समर्थन केल्याच्या आरोपाखाली कारवाई केल्या जाईल का? हा मुद्दा खूप महत्वाचा आहे. मुद्दा धर्माचा आणि पक्षाचा मुळीच नाही. देशाच्या व देशातील लोकप्रतिनिधी च्या सुरक्षेचा प्रश्न आहे. या प्रश्नांवर पक्ष, धर्म बघून मुळीच चौकशी व चर्चा होऊ नये पण यामध्ये ही सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, सरकार खरचं या प्रकरणाची सखोल चौकशी करून दहशतवादी तरुण व त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणारे सह दहशतवादी यांच्या वर दहशतवादी कृत्य करून लोकप्रतिनिधी च्या हत्येच्या कटाचे खटले भरून योग्य ती शिक्षा देतील का हा सखोल संशोधनाचा विषय झाला आहे. दहशतवादी हल्याचा विचार केला तर अनेक प्रश्न उपस्थित राहून सरकारचे अपयश दिसुन येते. परंतु महत्त्वाचा मुद्दा हाच कि बिजेपी खासदारांच्या गेटपासने आत गेलेले दहशतवादी बिजेपी शी संबधीत नसतील कशावरून? दहशतवादी हल्ला करण्याबाठी बिजेपीच्या खासदारांनी गेटपास का दिली असेल? हल्ला घडवून आणण्यामागे नेमका हेतु कोणता असेल? हल्ला घडवून आणण्यासाठी सर्वसामान्य घरातील तरुणांची निवड का केली असेल? कारण कधीही चुकिचे काम करून घ्यायचे तर जाती धर्माच्या नावाखाली लोकांना भावनीक बनवून त्या भावनेला भांडवल बनवून त्याचा वापर केला जातो. परंतु संसदेवर दहशतवादी हल्ला करताना तरुणांच्या डोक्यात नेमके काय पेरले असेल? स्वतः च्या च देशात केवळ काही आमिषाला बघुन स्वतः च्या भविष्याचा विचार न करता गुन्हेगार मध्ये तरुण पाय ठेवत असतील तर त्या देशात बेरोजगारी किती असेल? त्या देशातील तरुणांच्या मनात राष्ट्रप्रेम किती असा असेल? त्या तरूणांना कुटुंबाची काळजी किती असेल असे गंभीर प्रश्न उपस्थित राहतात. परंतु हाताला काम नसल्याने गुन्हेगारी प्रवृत्ती कडे जर तरुण वळत असतील तर ही बाब देशाच्या सुरक्षतेसाठी गंभीर स्वरुपाची तर आहेच परंतु देशातील नागरिकांच्या सुरक्षतेच्या दृष्टीने खुपच महत्वाची आहे. संसद हल्ला प्रकरणाची चौकशी ही केवळ गेटपास देणारे बिजेपी चे खासदार आहेत म्हणून योग्य दिशेने न होता, दहशतवादी व त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे मदत करणारे यांना सत्तेचा वापर करून पाठीशी घालण्याचा जर प्रयत्न केला गेला तर ही सर्वात वाईट घटना असेल. इलेक्ट्रॉनिक मिडीया संसद प्रकरणाला सौम्य करून देशातील नागरिकांची दिशाभूल करून दहशतवादी लोकांना अप्रत्यक्ष पणे मदत करण्याचा प्रयत्न करत आहेत. कधी कधी खरंच इलेक्ट्रॉनिक स्ट्रीम मिडीया च्या लाचारीची किव येते मिडीया हा जनतेचा असतो, विरोधी पक्ष म्हणून मिडीया ने भुमिका पार पाडायला पाहिजे तर मिडीया सरकारची बाजु घेऊन राजकीय पक्षाचा अजेंडा लोकांसमोर मांडत आहे हे ही खुप घातक आहे. मिडीया जरी संसद हल्याचे गांभीर्य दाखवत नसेल तरीही हि गंभीर बाब समजून घेणे खूप आवश्यक आहे. कारण सत्तेत असणारे, हल्ल्याला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष मदत करणारे एकच असतील तर देशाचे व नागरिकांचे रक्षण कोणी आणि कोणापासून करायचे हा मोठा प्रश्न उपस्थित राहतो.



# लग्नाच्या वेळेला महत्त्व देणारा कोहळी समाज...!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**लग्न म्हणे करून पहा घर म्हणे बांधून पहा गरीबाच्या लग्नात सतरा विघ्न असे म्हणणारे समाजात अनेक लोक मिळत असतात. पण,लग्न समारंभ शेवटपर्यंत कशाप्रकारे पार पडला पाहिजे ही चिंता फक्त ज्या घरात लग्न असते त्याच घरातील मुख्य माणसाला व घरातील सर्व सदस्यांना लागलेली असते. लग्नासारखे पवित्र बंधनाचं नातं असलेला तो दिवस प्रत्येक मुला, मुलींच्या जीवनातील खूप आनंदाचा दिवस असतो. कारण लग्न हा दोन जीवाच्या मिलनाचा, स्नेहाचा पवित्र बंधनात अडकण्याचा दिवस असतो. हे सर्वांना चांगल्याप्रकारे माहीतच आहे.**

पण,तेच लग्न जर वेळेवर लागत नसेल तर मात्र लग्न सोहळ्यात उपस्थित असलेल्या पाहुण्यांना खूप त्रास सहन करावा लागतो. त्या सोहळ्यात नुसते महिला किंवा पुरूष उपस्थित राहतात असेही नाही लहान मुले सुद्धा उपस्थित असतात बरेचदा लग्न उशीरा लागल्यामुळे पाहुण्यांना उपाशी परत जावे लागते, खूप गैरसोय होते कारण लग्नपत्रिकेत दिलेल्या वेळेला महत्व न देता डिजेच्या तालावर ठेका धरून नाचण्यातच लग्नाची वेळ निघून जाते दहा वाजेचा लग्न दोन वाजता लागतो हे, खरंच योग्य आहे का...? पण,याच मातीत असलेला असा एक समाज आहे की, लग्नाच्या वेळेला महत्व देत असतो त्या समाजाचे नाव कोहळी समाज आहे. हा समाज एवढ्या पुरतेच आहे असे नाही ह्या कोहळी समाजात एक वेगळ्या प्रकारची विशेषतः आहे ती म्हणजेच हा समाज प्रगतशील व विकसित समाज आहे या समाजातील लोक खूप कष्टकरी व मेहनती आहेत वेळेवर शेतीकडे लक्ष देतात, व भरपूर उत्पन्न काढतात,पुन्हा दुसरी विशेषतः म्हणजेच या समाजात काही दिवसांपासून कोटापालटा करण्याची पध्दत होती कोटापालटा म्हणजेच आपली मुलगी देणे व त्याच घरची मुलगी आपल्या घरची सून करून घेणे असे होते त्यामुळे कुठेतरी नाते संबंधित जुळून राहत होते, एकत्र कुटूंब पध्दत बघायला मिळत होती आणि आजही बघायला मिळत आहे. त्याच प्रमाणे तिसरी विशेषतः म्हणजेच समाजात एखादा मुलगा उच्च शिक्षण घेऊन परिस्थितीमुळे गरीब असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता आपुलकीच्या नात्याने समाजबांधव त्याला मदत करून माणुसकी धर्म निभावून दाखवतात. कोहळी समाजात असलेली ही एकता व आपुलकी जगावेगळी आहे. सोबतच लग्नाच्या मेळाव्याचे आयोजन करतात अशा बऱ्याच विशेषतः कोहळी समाजात आहेत की,आजच्या प्रत्येक समाजासाठी प्रेरणादायी व आदरपूर्वक आहेत.खरंच ह्या समाजाकडून सृष्टीवर असणाऱ्या प्रत्येक मनुष्य प्राण्यांनी काहीतरी शिकून घेण्यासारखे आहे. खास करून लग्नाच्या वेळेला कशाप्रकारे महत्व दिल्या जाते ही शिकवण घेणे आजच्या घडिला अत्यंत काळाची गरज आहे. आजपर्यंत मी बऱ्याच लग्न संमारभात गेली आहे आणि लहानपणापासून बघत आहे पण,कोणत्याही समाजाचे लग्न पत्रिकेत दिलेल्या वेळेवर लागत नाही. तसंच आजपर्यंत मी बरेच कोहळी समाजाच्या सुद्धा लग्न समारंभात गेली आहे त्यावेळी बघते तर लग्न पत्रिकेवर दिलेल्या वेळेवर एक सेंकद इकडे नाही, एक सेंकद तिकडे नाही वेळेवर लग्न लागतात. म्हणजेच वेळ किती महत्वाची असते आणि का महत्वाची असते कदाचित कोहळी समाजातील लोकांना वेळेचे महत्व कळत असणार यात काही शंका नाही. आजपर्यंत कोणत्याही समाजातील होणाऱ्या लग्न वेळेविषयी बोललेले ऐकायला मिळत नाही ,लिहिलेले वाचायला मिळत नाही पण,कोहळी समाजाच्या विषयी बोलले जाते व लिहिले जाते, ते फुकटच नाही हे माझे वयक्तिक मत आहे. म्हणूनच कोहळी समाज लग्नाच्या वेळेला किती महत्व दितो या विषयावर झाडीपट्टीतील हास्य कवी म्हणून ओळखले जाणारे विसोरा येतील जेष्ठ कवी आदरणीय एकनाथ बुद्दे यांनी सुगंध फुलला शब्दांतून या काव्यसंग्रहात कोहळी समाज या शीर्षकावर एक कविता लिहिली आहे. त्यातील दोन ओळी आज या लेखात लिहीत आहे. वकील, मजिस्ट्रेट, इंजिनिअर, साहित्यिक, कलावंत,दिले शेतकरी, ट्रक्टर जोपासून डॉक्टर बनविले कोहळी मोठेच कष्टकरी कोहळी समाज विवाह सोहळा काढून तर सर्वाशीच नाता जोडला पण,वेळेवर लग्न लावून सर्वाचाच रेकॉर्ड तोडला या कोहळी समाजासारखा प्रत्येक समाज संघटित असावा, प्रगतीशील समाज असावा, अशी एकता व विचारसरणी असावी,आपल्या समाजातील एखाद्या गोर, गरीब कुटुंबाला आधार देतात म्हणून ह्या समाजाला आदर्श समाज म्हणून ओळखल्या जाते. वेळेला महत्व देणारा हा आदर्श कोहळी समाज आहे त्यांच्या लग्न समारंभात पाहुण्यांची गैरसोय होत नाही तर वेळेला महत्व देऊन लग्न लावतात म्हणून आजपर्यंत लग्न वेळेवर लावण्यात कोहळी समाजाचा रेकॉर्ड कोणीच तोडले नाही आदर्श असलेल्या कोहळी समाजाचा व त्यांच्यात असलेल्या विशेषतः विषयी मला अभिमान वाटतो.



# पीएच. डी. प्रकरणी वादग्रस्त विधान आणि तोंडदेखली दिलगिरी !

आधुनिक केसरी

**पीएच. डी प्रकरणाच्या विधानावरून विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर समाजातील सर्वच स्तरावरून सडकून टीका झाली. परिणामी त्या विधानावावरून दिलगिरी व्यक्त करण्याशिवाय पर्याय नव्हता आणि झाले ही तसेच. दिलगिरी व्यक्त करताना माझ्या वक्तव्याचा विपर्यास करण्यात आल्याचे सांगण्यास उपमुख्यमंत्री विसरले नाहीत. यात विपर्यास करण्याजोगे काहीच नव्हते. कारण जे होते ते लोकांसमोर होते. वृत्त वाहिन्या, सामाजिक प्रसारमाध्यमे यांच्या आधारे महाराष्ट्राने उपमुख्यमंत्र्यांनी केलेले वादग्रस्त विधान ऐकले आहे. एकतर स्वतः वादग्रस्त विधाने करत रहायची आणि त्याची झळ बसू लागल्यावर दिलगिरी व्यक्त करताना इतरही कसे दोषी आहेत त्यामुळे माझ्या योग्य विधानाचा विपर्यास झाला. यावरही ठाम रहायचे.**

याला दिलगिरी नव्हे तर मग्रुरी म्हणता येईल. चुकीची विधाने करायची आणि वाक्यांचे खेळ खेळायचे याला काही शहाणपणा म्हणत नाहीत. सुंभ जळाला तरी पीळ कायम आहे. अशा पद्धतीचा फुसका बाणा काय कामाचा ? असे नेते शिक्षण क्षेत्राकडे किती संकुचित नजरेने पाहतात ? हे या निमित्ताने महाराष्ट्रासमोर आले. पोटातलेच ओठात आले असे म्हणता येईल. निवडणूक लढवण्यासाठी पीएच. डी असण्यासह लेखी परीक्षा देऊन त्यात मेरीटप्रमाणे उत्तीर्ण होणे आणि मगच निवडणूक लढवण्यासाठी अर्ज भरणे ही अट असती तर बरे झाले असते. महाराष्ट्राला उच्चशिक्षित, विचारवंत आणि शिक्षणाचे महत्त्व असणारे लोकप्रतिनिधी लाभले असते. मग अशा हुशार लोकप्रतिनिधींच्या लोकसेवेच्या कार्याचा प्रकाश महाराष्ट्रात किती प्रखरपणे पसरतो ? हे देशालाही कळले असते. दुसरे सूत्र असे की, पीएच. डीची पदवी प्राप्त करणे इतके सोपे वाटते तर अद्याप किती लोकप्रतिनिधींनी ती पदवी प्राप्त केली ? हे महाराष्ट्रातील जनतेला कळेल का ? कारण तिथे संशोधन करावे लागते. त्यासाठी बुध्दीला मेहनत घ्यावी लागते. अभ्यास करावा लागतो. केवळ वायफळ बडबड करणाऱ्यांचे ते काम नाही. त्यासाठी मनाची एकाग्रता, बुद्धीचा निश्चयही तितकाच मोलाचा ठरतो. पण या सर्व सूत्रांचा मेळ घालायचा तरी कसा ? कारण अभ्यासाशी वाकडे असणारे कैक लोकप्रतिनिधी लाभलेले आहेत. ज्यांचा आणि अभ्यासाचा संबंध नाही. कैक विद्यार्थी पदवीधर होतात. पैकी काही पुढे पोस्ट ग्रॅज्युएशन पूर्ण करतात. पण यांतील सर्वच जण बाजारात जे कौशल्य हवे आहे त्यात निपुण असतात असे नाही. त्यामुळे उच्च शिक्षित असूनही अंगी योग्य ते कौशल्य नसल्याने बेकार तरी राहावे लागते किंवा मिळेल ते काम गोड मानून करावे लागते. भारतात या वर्गवारीतील लोकांची संख्या अधिक आहे. परिणामी बेकारीचा आकडा फुगत चालला आहे. त्यावर काढण्यात येणाऱ्या उपाययोजनाही प्रभावी नाहीत. त्यावर काही काम करणार का ? त्याविषयी बोला. जेणेकरून विद्यार्थ्यांना केवळ उत्तीर्ण होणारे न बनवता त्यांनी शिक्षण घेण्यासाठी जी वर्षे खर्च केली त्यांचा योग्य विनियोग करण्यासाठी इयत्ता १२ वी नंतर घेण्यात येणाऱ्या व्यावसायिक शिक्षणात कुठे बदल करता येईल हे पहाता येईल. त्यावर काही तरी बोला. तिथे तुमच्याकडून दिवे लागतात का ? ते पहा. मग इतर जण कोणती पदवी घेऊन काय दिवे लावतात ते पहाता येईल.

राजकारणात काही लोप्रतिनिधींनीची जीभ वरचेवर घसरत असते आणि त्याचा त्यांना फटकाही बसतो. मात्र आपल्या या सवयीत बदल करतील ते असंयमी नेते कुठले ? कधी जाहीर सभांत जमा झालेल्या गर्दी समोर वाचाळपणे बोलतात तर कधी पत्रकार परिषदेत पत्रकारांवरच ओरडण्याचे काम करतात. मी असा फटकळ, रोखठोक स्वभावाचा माणूस आहे. जे पोटात तेच ओठात वगैरे दाखवण्याचा त्यांचा असलेला स्वभाव बऱ्याच प्रसंगी अशा लोकांच्याच अंगलट येतो आणि त्याचे रुपांतर कधी माफीनामा पत्रक प्रसिद्ध करण्यात होते तर कधी पत्रकार परिषद घेऊन माफी मागून वादग्रस्त वक्तव्य प्रकरणावर पडदा टाकावा लागतो. सरसकट सर्वच नेते उतावीळपणे विधाने करतात असे नाही. तर काही नेते अभ्यासपूर्ण, संयमी वक्तृत्व यांसाठी प्रसिद्ध असतात. अशा नेत्यांकडून उतावीळपणे विधाने करणाऱ्या नेत्यांनी त्यांचे गुण आत्मसात केले पाहिजे. माझा स्वभावच रोखठोक आहे. हे सूत्र सार्वजनिक जीवनात वावरताना उपयोगी नाही. अशा स्वभावाची व्यक्ती स्वतःचेच




म्हणणे खरे करण्यासाठी वाटेल ते करण्याची सिद्धता ठेवतात. मात्र सहसा माघार घेत नाहीत. पण हाताची पाचही बोटे जशी सारखी नसतात. तसे परिस्थितीसुद्धा कायम आपल्यासाठी अनुकूल असते असे अजिबात नाही. शेरास सव्वाशेर भेटतोच असे म्हटले जाते. तसे झाले की तोंडावर आपटले जाते आणि सारवासारव करून प्रकरण शांत करण्याचा आटापिटा केला जातो. अतिशहाणा त्याचा बैल रिकामा म्हणतात ते यालाच.

स्वतःच स्वतःच्या अडचणी वाढवून इतरांना दोष देण्यात काहीच तथ्य नाही. यालाच तर गिरे फिर भी टांग उपर असे म्हणतात. तोंडदेखली दिलगिरी व्यक्त करायची आणि मी केलेल्या विधानाचा इतरांनी विपर्यास केला असे सांगायला विसरायचे नाही. स्वतःहून मनापासून दिलगिरी व्यक्त करणारा दुसऱ्याच्या खांद्यावर बंदूक ठेवत नसतो. परिणामांना सामोरे जाण्याची धमक बाळगून असतो. विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाल्यावर व्यक्त केलेली दिलगिरी ही केवळ औपचारिकता उरते. तीही व्यक्त केली नाही तर विरोधक आक्रमक होण्यास आपणच वाव दिला असे होऊ नये आणि त्यांची आक्रमकता अवघड जागेचे दुखणे बनून तापदायक ठरू नये. यासाठी दिलगिरी व्यक्त केली की किमान वेळ तरी मारून नेत, पुढे सरकता येते. नाहीतरी विरोधक चुका शोधतच असतात. असे असताना चूक करून त्यांना संधी देणे म्हणजे आपण ज्यांच्यासह सत्तेत आहोत त्यांची नाराजी ओढवून घेणे होय. ही झाली एक राजकीय हानी आणि दुसरी म्हणजे ज्या सूत्राला अनुसरून वादग्रस्त विधान करण्याचा वाचाळपणा केलेला असतो. त्यामुळे नाराज झालेल्या वर्गाची नाराजी. राजकारणात लोकसंग्रह करण्यासाठी आहोत की त्यांना तोडण्याचे काम करण्यासाठी आहोत ? यावरून तुमची उपयुक्तता ठरत असते.

नेत्यांनी वादग्रस्त विधाने करायची आणि त्याचे परिणाम कार्यकर्ते - पदाधिकारी यांनी सोसायचे. असे चालू असते. पण वाचाळपणा करणाऱ्यांना स्वतःच्या स्वभावात पालट करावासा वाटत नाही. अगदीच काही जमत नसेल तर किमान कोणीतरी यांना एवढ सांगा की, वादग्रस्त विधाने करू नका. याने आमच्या अडचणी वाढतात आणि त्या निस्तरताना आमच्या नाकीनवू येतात. ही कार्यकर्त्यांची हाक नेत्यांपर्यंत पोचूनही काही उपयोग नसतो. कारण ते त्यांचा हेका काही केल्या सोडण्यास सिद्ध नसतात.

जाहीर सभांना गर्दी जमवण्यासाठी, आपल्यावरच काय तो मतांचा बदाबदा पाऊस पडावा यांसाठी मतदानाच्यावेळी येणारी लोकांची आठवण इतरवेळी येत नाही. तेव्हा त्यांच्याशी फटकून वागले जाते. राजकारणात वर्षानुवर्षे वावरूनही कसे बोलावे ? याचे ताळतंत्र नसणारे लोकप्रतिनिधी या क्षेत्रात इतके वर्षे कार्यरत असून काय उजेड पाडत आहेत ? केवळ राजकीय क्षेत्रात असण्याची वर्षे वाढत राहिली मात्र इतरांकडून शिकण्याची उमेद नसल्याने यांची पाठी कोरीच राहिली.

तोंडाचा फटकळपणा उपयोगी नाही, तर लोकांच्या कामांचा वेगवान उरक असणे आवश्यक आहे. असे असले तरीही मी वादग्रस्त विधाने करत राहायची आणि लोकांनी ती निमुटपणे ऐकायची असे कसे होणार ? राजकारणाला शिस्त लावायची असेल तर प्रथम नेत्याने स्वतःपासून त्याचा आरंभ करायचा असतो. राजकीय सभांतून शिस्तीविषयी भाषणबाजी करणारे उपमुख्यमंत्री वादग्रस्त विधाने करण्यासाठीच परिचित आहेत आणि तीच ओळख कायम राहावी अशीच त्यांची इच्छा दिसते. कारण वादग्रस्त विधानांच्या मालिकेत खंड पडण्याचे चिन्ह दिसत नाही.

जयेश राणे
मुंबई

# बेरोजगारीचे अदृश्य संक्रमण...



परमेश्वर घुंगासे
संपर्क क्र. 7499643065

आधुनिक केसरी

**शाळा, महाविद्यालय आणि मग पदवीसाठी विद्यापीठ अस एक पारंपारिक शैक्षणिक गणित आपल्याकडे आहे, त्या ओघात संपूर्ण शिक्षण घेतेवेळी तमाम विद्यार्थी वर्गात कमालीची ऊर्जा, अपेक्षांचे अगणित स्वप्ने आणि भविष्याची एक सुंदर अशी काल्पनिक घडी बसवलेली असते मात्र शिक्षण पूर्ण झाल्यानंतर वास्तव जीवनात ती घडी पूर्णपणे विस्कळते स्वप्नांचा पुरता बोजवारा उडाल्याचे चित्र समोर अनाकलनीय रुपात उभे राहते आणि मग निर्माण होते.**

अजून एका उच्चशिक्षित बेरोजगार युवकांची फळी ! पंचवीस ते तीस च्या काळात शिक्षण घेणाऱ्या प्रत्येकाच्या आयुष्यात एक टप्पा असा येतोच जिथे सर्व सुरळीत सुरू असताना अचानक अडचणी वेढा घालायला सुरू करतात. आंतरिक भीतीची अनामिक भावना तयार होते, डिप्रेशन, आर्थिक, शैक्षणिक,पारिवारिक भविष्याची गंभीरता आतून पोखरत असते,उमेदीचे वर्षे शिक्षणात घातल्यानंतर हाती रीते कल्पना वास्तवाशिवाय काहीही शिल्लक राहिले नाही असे समजल्यावर मानसिक दडपण,प्रशासनाबद्दल अनास्था मनात घर करायला लागते बरेच जण या काळाशी संयमाने सुसंगत जुळवून आणायला चुकतात आणि अगदी टोकाचे पाऊल उचलून उरलेल्या आयुष्याला मुकतात मात्र याच्याच उलट सकारात्मक विचार केला तर हा तोच काळ असतो जिथे समाजवर्गाची वास्तविकता तुमच्या डोळ्यांसमोर उभी राहते,याच काळात तुम्हाला शाश्वत दुनियादारीच्या असंख्य गणितांची उकल होते,मनात असलेले भ्रम दूर व्हायला लागतात,सत्यता स्वीकारायला आणि भविष्यात येणाऱ्या असंख्य अडचणींना सामोरे जाण्यासाठी आपण मानसिकरित्या परिपूर्ण होतो ते याच काळात! नवीन तंत्रज्ञानाच्या सामान्य जीवनात केलेल्या घुसखोरीने खर तर रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा होती सत्य परिस्थिती पाहता तंत्रज्ञानाने आहे तो रोजगार जाण्याची भीती कित्येक क्षेत्रात व्यक्त केल्या जात आहे,दीड जीबी डेटा ने मोठ्या प्रमाणात तरुण पिढी आज घडीला आत्ममग्न होऊन येणाऱ्या गंभीर दिवसांकडे दुर्लक्ष करण्याचा मनोरंनशिर मार्ग जवळचा करते हे दुर्दैव आहे. शिक्षणव्यवस्थेप्रती युवकांची होत असलेली कुचंबणा ही समस्या राष्ट्राला काही नवीन नाही मात्र पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या पारंपारिक शिक्षण पद्धतीने प्रत्येक विद्यार्थी आणि पालकांच्या मनावर अगदी स्पष्ट बिंबवलय की या मार्गाने हेच शिक्षण घेणे गरजेचे आहे अथवा हेच शिक्षण घ्यावे लागेल परणीनामी होत देखील तसच, समोरच्या वाहन चालकाचा पाठलाग करताना तो खड्ड्यातून गेला की आपल्याला आपोआप इच्छा नसताना देखील खड्ड्यातून जा लागत मग असंख्य उच्चशक्षणासाठी गेलेले पारंपारिक शैक्षणिक व्यवस्थेचं अनुकरण करत बेरोजगारांचे थवे म्हणून बाहेर पडतात!



आजकाल जसे आपण बरेच असंख्य इंजिनियर,बी. ए . एम.ए. विविध क्षेत्रातील उच्चपदवीधर बेरोजगारांना रोजगाराच्या शोधत वणवण भटकताना पाहतो आहोत, याच पारंपारिक शैक्षणिक व्यवस्थेच्या कारणास्तव त्यांची संख्या जास्त आहे. आजकाल प्रत्येक विद्यार्थ्याला इतरांचे अनुसरण करायचे आहे, त्याला स्वतःचा काहीच विचार नाही, त्याने फक्त इतरांकडे पाहून आपले क्षेत्र निवडण्यास सुरवात केली आहे.याचा मानसिक पश्चात्ताप हा कालांतराने डोळ्यासमोर गंभीर परिणामांचे अनुत्तरित प्रश्न घेऊन उभा राहतो ! बेरोजगारी हा कोणत्याही देशासाठी, समाजासाठी किंव्हा येणाऱ्या समूळ पिढीसाठी एक शाप आहे. यामुळे दारिद्र्य, भूक आणि मानसिक अशांतता तर पसरतेच किंबहुना दुसरीकडे तरुणांमध्ये असंतोष आणि आणि गुन्हेगारी देखील वाढते. चोरी, डकैती, हिंसाचार, गुन्हेगारी आणि आत्महत्या या अधिक समस्यांच्या मुळाशी उत्तरे केवळ बेरोजगारी आहे.. बेरोजगारी हे एक भयंकर विष आहे. ज्याने संपूर्ण देशाचे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवन दूषित केले आहे, मग त्याची कारणे शोधून काढणे फार महत्वाचे आहे.मागच्या काही दिवसात काही तरुणांनी भारताच्या संसेदेत बेरोजगारीचा मुद्द्यावर सरकार विरोधी निदर्शने केली त्यांच्यावर दहशतवादी विरोधी कायद्या अंतर्गत गुन्हे दखल झाले मात्र तरीही मूळ मुद्द्याचा तिढा कायम आहे, संसद भवनात आणि बाहेर केलेली निदर्शने भारतीय मिडिया मधे उडालेला ब्रेकिंग चा गोंधळ या सर्वात मात्र मूळ मुद्दे अजूनही अनुत्तरीतच आहेत.हीच भयावह परिस्थिती कित्येक युवकांना भेडसावत असते, मानसिक दडपण आणत असते,पश्चात्तापाची निरर्थक भावना मनात जागा घ्यायला लागते, मग याला जाबदार आहे तरी कोण? शिक्षण संस्था? शैक्षणिक संकुले? प्रशासनिक स्तरावर काम करणारी शिक्षण व्यवस्था ? की रोजगानिर्मिती करण्यासाठी सपशेल निकामी ठरलेले शासन ? की शिक्षण म्हणजे रोजगार अशी भावना बाळगून शिक्षण घेणारे स्वतः विद्यार्थी ?या प्रश्नांची उत्तरे आजतागायत छुपी आहेत,जोपर्यंत याची ठोस आश्वासक उत्तरे समोर येत नाहीत तोपर्यंत बेरोजगारीचे हे अदृश्य संक्रमण असच पिढ्यानपिढ्या फोफावत राहील यात दुमत नाही!

# वैद्यकीय शिक्षण परवडणारे व्हावे !

आधुनिक केसरी

भारतात ८३४ नागरिकांना मागे एक डॉक्टर तर ४७६ मागे एक परिचारिका अशी स्थिती असल्याचे केंद्रीय आरोग्यमंत्र्यांनी माहिती दिली. देशाभरातील लोकसंख्येच्या मानाने ही संख्या अपुरीच वाटते, सहाजिकच आरोग्य सेवा आणि उपचारास येणारे रुग्ण यांची हेळसांड होताना नेहमी वाचनात, अनुभवास येत असते. मानवी जीवनमरणाशी संबंधित असलेल्या या परिस्थितीची सुधारणा होणे अत्यंत गरजेचे आहे अगदी प्रथम प्राधान्याने. वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये 82 टक्के वाढ झाल्याचीही माहितीही दिली गेली ही समाधानाची बाब आहेच परंतु वैद्यकीय शिक्षण एवढे महाग झालेले आहे की सर्वसामान्य सोडाच पण मध्यमवर्गीयांना सुद्धा न परवडणारे असून, श्वास कोंडणारे झालेले आहे असं म्हटल्यास वावगे होणार नाही. पात्रता, गुणवत्ता, कष्ट करण्याची जिद्द आणि शक्ती विद्यार्थ्यांकडे असूनही त्याला वैद्यकीय शिक्षणाबाबत वंचित राहावे लागते ते केवळ आणि केवळ आर्थिक बाबत पालकांना न परवडणाऱ्या खर्चीक वैद्यकीय शिक्षणामुळे अर्थात यावर सर्वप्रथम विचार होणे गरजेचे वाटते.

विश्वनाथ पंडित
९५८८४५०४४२



# सामाजिक स्वास्थ्याचे गमक


रणदीप बिसने
संपर्क क्र. 7798123699

आधुनिक केसरी

**जग जरा जास्तच गतिमान झाले आहे. मनुष्य आपल्या व्यक्तिगत जीवनामध्ये रममाण न होता गुंत्यात सापडल्यासारखा वागत असल्याचे जाणवते.घरातील सदस्यांचा आपापसातील संवाद कमी झाले आहे. शेजारी तर दूरच ! ही सद्यस्थिती शहरी व ग्रामीण जीवनात भिन्न असेलच, यात शंका नाही. ग्रामीण जीवन हे फार गतिमान नसल्याने इथे संवाद सर्वत्र घडत असतोच. पण गतिमान युगाचा परिणाम गावाखेड्यांवरही पोहोचल्याचा आभास होत आहे. ग्रामीण भागातील जीवन परस्पर सहकार्याचे असते.इथे एकमेकांच्या सुखदुःखात शेजारीच नाही तर सकल गावकरीही सहभागी होत असतात.**

कुणाच्या घरी कुणी मृत झाल्यास मोहल्ल्यातील मंडळी निरोप देण्यापासून ते घाटावरून घरी येत दुखवटा भोजन देईपर्यंत सर्व कामकाज पार पाडत असतात.ही मानसिकता खर्या अर्थाने समानुभूती होय. आज शासकीय किंवा खाजगी कार्यालयांमधील परस्पर स्नेहमय वातावरण संपत चालल्याचे विदारक दृश्य मनाला वेदना देऊन जाते. आधी आपल्या कामात मग्नता जपत कार्य काटेकोरपणे करण्याची कार्यपद्धती सर्वच कार्यालयांत आढळायची. सद्यस्थितीत आपले कार्य सचोटीने न करता केवळ इतरांवर दोषारोप करीत बसण्यात धन्यता मानण्याची विकृती जडत असल्याचे जाणवते. कुठल्याही संस्थेच्या यशामागे तेथील कर्मचार्‍यांची सचोटीपूर्ण व परस्पर विश्वासाने कार्य करण्याची प्रवृत्ती विद्यमान असते.पण परस्पर विश्वास व परस्परांशी सस्नेह वर्तनाशिवाय वागल्याने कार्यनिष्पत्तीत कुठेतरी अभाव जाणवत असतो.अर्थात संस्था/संघटनेच्या यशात अडसर निर्माण होतात.

परस्पर विश्वास व सहकार्याची भावना म्हणजेच यशाची शंभर टक्के खात्री असते. ही परस्पर सहकार्याची भावना म्हणजेच समानुभूती होय. आपल्या सहकारी मंडळींविषयी कुठलाही आपपरभाव न ठेवता केवळ उद्दिष्टपूर्तीसाठी कार्यप्रवृत्त होणे यात अपेक्षित असते.जो तो आपल्या कुवतीप्रमाणे आपले एफर्टस् देण्याचा प्रयत्न करीत असतो.कुणी कौशल्य असूनही कामचोर वृत्तीमुळे कार्यास टाळाटाळ करत असेल तो भाग वेगळा ! पण उत्स्फूर्तपणे कार्य करण्यास प्रवृत्त असलेला सहकारी नेहमीच संस्थेला/संघटनेला उपयुक्त ठरत असतो.त्याचे उणे-ऋणे समजून घेत प्रसंगी समजावून सांगत विश्वासाने आपल्या सोबत कार्यप्रवृत्त करणे यासारखे दुसरे मोठेपण नाही.हीच ती समानुभूती ! एखादे कार्य सहकार्याने करत असता तिसऱ्या व्यक्तीजवळ नकारात्मक बाजू मांडणे आज सर्रास दिसून येत आहे.अशा नकारात्मक भावनांचा प्रादुर्भाव सर्वत्र होत असल्याने कार्य सिद्धीस जाण्यास मज्जाव येत असतो.

समानुभूती ही सहानूभूतीपेक्षा वेगळी तर असतेच पण सरसही असते.सहानुभूती ही केवळ तात्पुरती आपलेपणाची भावना असते.पण समानुभूती ही कायम सकारात्मक ऊर्जा देणारी असते.अहम् कडून वयम् कडे नेणारी अशी ही भावना असते.मनाला संकुचित अवस्थेकडून व्यापकतेकडे घेऊन जात असते.

एका कार्यालयात एक ज्येष्ठ कर्मी असतात.ते त्यांच्या प्रारंभी काळात अतिशय तत्पर असायचे. दरम्यानच्या काळात एका आजारामुळे त्यांच्या कार्यात अडथळे यायला लागले व कामात थोडा संथपणा यायला लागला.त्यांच्या सहकर्मींनी त्यांच्या या अधुपणाला त्यांचा कमीपणा न समजून घेत ते सहज करू शकणारे कार्य त्यांना देऊ लागले. कधी कुठे विसंगत आचरण जाणवल्यास ते स्वतः पूर्ण कार्य करू लागले.पण त्यांना त्यांच्यातील कमीपणा खलू नये यासाठी तदनुरूप ते वागू लागले.यामुळे त्या सहकर्मीचा आत्मविश्वास व स्वाभिमान तेवत राहू शकला.एक मनुष्य आपल्या पोटापाण्याच्या नोकरीसोबतच ताणरहित जीवनही जगू शकला. हीच तर खरी समानुभूती होय. समानुभूती ही केवळ उपभोक्त्याचेच जीवन समृद्ध करत नसते तर समानुभूती बाळगणार्याचे जीवनही



समृद्ध व शुचिर्भूत करत असते. आज ही भावना लोप पावत चाललेली आहे.त्यामुळेच समाजात अशांती, द्वेषभाव,जाळफोळ अशा भयानक बाबी दृष्टीपथास पडताहेत. संत तुकाराम महाराज म्हणतात."निंदकाचे घर असावे शेजारी." पण हे निंदक तयारच होऊ नये यासाठी उपाय करता येणार नाहीत काय ? यावर सुजाण व्यवस्थापक मंडळींनी विचार करणे क्रमप्राप्त आहे.

एका कार्यालयात एक महिला कर्मी नव्याने रूजू झाली. अतिशय साधी राहणी असलेल्या त्या महिलेच्या जीवनात अतिशय अल्पावधीत दुःखद घटना घडली. तीचे पती मरण पावले.ती महिला दुःखात बुडाली. ती कामात कुठेही कुचराई करीत नव्हती.तीला कुचराई म्हणजे काय हेच माहित नव्हते.अतिशय कार्यमग्न कर्मी या शोकसागरातून बाहेर पडायला वेळ लागणारच होता.गरज होती सहकारी मंडळींच्या सहकार्याची अर्थात समानुभूतीची ! सहानुभूतीची नाही.कारण ती कमाल वेळ या कार्यालयात कार्यरत राहणार होती.पण वेगळंच काहीतरी तिच्याशी घडणे सुरू झाले.तिला अनावश्यक सल्ले देणे सुरू झाले. तिला कुणाच्या सल्ल्याची गरज नसतांनाही, अपेक्षित नसतांनाही तिला दुसरे लग्न, एकट्या स्त्रीया अशा असतात तशा असतातचे टोमणे या अमानवीय टोमण्यांनी व सल्ल्यांनी ती महिला कर्मी पतीविरहापेक्षा जास्त निराश व्हायला लागली.कुठे सांगायचे,कुणापुढे आपली व्यथ मांडायची याची काही नीटशी कल्पना नसल्याने ती महिलाकर्मी पार कोलमडली.अर्थात समानुभूतीच्या अभावाने एका मानवी मनाचे कुचंबन व्हायला लागले.तोंडावर सहानुभूती देणारे तर सभोवतलीच होते. पण समानुभूती....?

जिथे समानुभूती नाही तिथे केवळ ओसाडपणा असतो.सहानुभूती म्हणजे केवळ कोरडे शब्द असतात.आपुलकीची भावना असते हे ठिकच पण कुणा मानवी मनाला आधार देणे म्हणजे त्याला धीर देणे नंतर अडचणीतून बाहेर पडायला सहकार्य करणे व त्याच्या उत्थानासाठी आत्मविश्वास प्रदान करणे ही प्रक्रिया यात असते. समानुभूती हा शब्द जरी जटिल वाटत असला तरी हा भाव ज्या व्यक्तीत असतो ती व्यक्ती खरोखर सहज व सोपी असते.

ग्रामीण जीवनात जी परस्पर सहकार्याची प्रवृत्ती दिसून येते तीच तर खरी समानुभूती होय. अतिशय खुलेपणा असतो.बोलण्यात अडगळपणा नसतो.वर्तनात तुटकता नसते.जे ही असते ते खुलेआम असते.वाद विवाद असतातच.पण ते एकमेकांसोबत राहूनच ! रोजगार हमी योजनेच्या कामाला संपूर्ण गावकरी भर उन्हात जात असतात. तिथे दोन तीन समूहात कुणीतरी एक जण घागरभर पाणी आणत असते तर संपूर्ण समूहातील लोकं ते पाणी सहज पितात.कुणाच्या घरी लग्नकार्य असल्यास मध्येच भोजन संपल्यस मोहल्ल्यातील महिल आपल्या घरचे साहित्य घेऊन स्वयंपाकास मदत करतात.घरची मंडळी नसली तरी पाहुणे उपाशी जात नाहीत.हीच तर खरी समानुभूती !

मनुष्य जीवनाची यथार्थता समानुभूतीच्या आचरणातच सिद्ध आहे.ही समानुभूती अभिव्यक्त करणे खूप कठीण नाही.ही तर मनुष्यजीवाची सहजप्रवृत्ती असते.सहज असणारी प्रवृत्तीच आज कठीण वाटायला लागली का ? तर हो.मनुष्य आज स्वार्थ व खोट्या प्रतिष्ठेमागे धावत सुटलाय. इतक्या गतीने तो धावायला लागला की त्याच्या आजुबाजुची आनंददायी दृश्यही तो गमावू लागला. अशी ही समानूभूती मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त करून देणारी एक नैसर्गिक औषधच आहे.

# दिल कांटों में उलझाया है...

आधुनिक केसरी

**`बॉबी'ने (१९७३) ऋषि कपूर हा ताजा टवटवीत नायक चित्रपटसृष्टीला दिला. त्यानंतर १९७६ साली प्रमोद चक्रवर्ती यांनी दिग्दर्शित केलेल्या `बारुद' या चित्रपटाचा हा सुस्वरूप अभिनेता नायक होता. त्याची नायिका होती शोमा आनंद ! `बॉबी'च्या डिम्पलशी शोमाची तुलना झाल्यास नवल नव्हते. शोमा नायिका म्हणून नंतर चमकू शकलीच नाही. `बारुद' पडला नाही; पण फार चाललाही नाही. या चित्रपटात अशोक कुमार, रीना रॉय, अजित खान, मदन पुरी, प्रेम चोपडा, सुजीत कुमार, डॉ. श्रीराम लागू, डेव्हिड, राज मेहरा, असरानी आदी नामवंत व गुणी सहकलावंतांची फौजच होती. संगीताची बाजू प्रमोद चक्रवर्ती यांचे आवडते संगीतकार दादा (सचिन देव) बर्मन यांनी सांभाळली होती तर आघाडीचे गीतकार आनंद बक्षी यांनी गीतलेखन केले होते.**

या चित्रपटात दाखविल्याप्रमाणे अनुप सक्सेना (ऋषि कपूर) आपले पोलिस निरीक्षक पिता दुर्गाप्रसाद सक्सेना (डॉ. श्रीराम लागू) यांच्यासमवेत मुंबईत राहात असतो. दुर्गाप्रसाद यांची सचोटी तसेच पोलिस दलातील दीर्घ व समर्पित सेवेबद्दल ते पोलिसपदकाचे मानकरी ठरतात. एके दिवशी अचानकपणे चार गुंड अनुपच्या देखत दुर्गाप्रसाद यांच्यावर हल्ला करून त्यांना मारहाण करतात आणि सरतेशेवटी त्यांची हत्या करतात. अनुपवर मोठा मानसिक आघात होतो. ही भीषण घटना त्याच्या मनात रुतून बसते. पित्याच्या हत्येचा बदला घेण्यासाठी तो पैसा जमा करतो आणि स्वतःला तंदुरुस्त ठेवतो. मारेकरी परदेशात पळाले असल्याचे त्याला समजते. त्यांचा माग काढण्यासाठी तो लास वेगास, न्यूयॉर्क, जिनेवा, माद्रिद, आणि पॅरिस या जगातील बड्या शहरांमधे जातो. पण आता त्याला स्वतःच्या जिवाला धोका आहे, असे वाटायला लागते. कारण न्यूयॉर्कमधला खासगी गुप्तहेर बलराज गुप्ता (अशोक कुमार) सतत त्याच्या मागावर असतो आणि मारेकऱ्यांविरुद्धच्या त्याच्या प्रत्येक खेळीवर गुप्त पाळत ठेवतो. कोणत्याही परिस्थितीत अनुपला अटक करायचीच असा त्याचा निर्धार असतो. पुढे काय होते ? अनुप पित्याच्या हत्येचा बदला घेण्यात यशस्वी होतो की कायद्याच्या कचाट्यात अडकतो, याचे उत्तर शेवटी मिळते. या चित्रपटातील "दिल कांटों में उलझाया है" हे लता मंगेशकर यांनी गायिलेले प्रणयगीत अनुप (ऋषि कपूर) आणि सीमा (शोमा आनंद) यांच्यावर चित्रित झाले आहे. संपूर्ण गीत परदेशातच चित्रित झाल्याने प्रेक्षकांना ठिकठिकाणची मनोहारी दृष्ये पाहायला मिळतात. दिग्दर्शक प्रमोद चक्रवर्ती यांनी नायक-नायिका यांना स्काय डायव्हिंग करताना दाखवून नेहमीपेक्षा गीताची सुरुवात आगळी वेगळी केली आहे. मला शत्रुसारख्या वाटणाऱ्या व्यक्तीबद्दल (नायक) आता प्रेम वाटू लागले आहे हे नायिका आनंदाचे भरते येऊन सांगते आहे. गीतकार आनंद बक्षी यांनी ते फारच सुंदर उदाहरणे देऊन शब्दबद्ध केले आहे. दादा बर्मन यांनी गीताला लावलेली चाल अत्यंत मधुर असून ती लता मंगेशकर यांनी आणखी श्रवणीय केली आहे. गीतात गिटार, कोंगो आदी वाद्यांचा वापर करण्यात आला आहे. या गीताच्या ओळी पुढीलप्रमाणे :

अनिल तोरणे
तळेगाव दाभाडे, पुणे

*दिल कांटों में उलझाया है*
*एक दुश्मन से प्यार आया है*
*शोला शबनम से लहराया है*
*एक दुश्मन से प्यार आया है*
*जादू सा चलने लगा है*
*मौसम बदलने लगा है*
*लगता है मेरे सीने से*
*दिल बाहर निकलने लगा है*
*शीशा पत्थर से टकराया है*
*न पास आने दिया है*
*न दूर होने दिया है*
*न होठों को हसने दिया है*
*न आंखों को रोने दिया है*
*बडा जालिम ने तडपाया है*
*ऐसा सितमगर कैसा*
*सैया बना रे न जाने*
*जब तक हो सका ये हमसे*
*हम रूठे रहे नहीं माने*
*यही गुस्सा ये रंग लाया है*



# पाण्याची बचत : काळाची गरज

आधुनिक केसरी


श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

राज्यातील तापमानाचा पारा जसा कमी होत चालला आहे तसाच राज्यातील पाण्याचा साठाही आटत चालला आहे. गेल्या काही दिवसात राज्यात पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात शेतीसाठी तर सोडाच पिण्यासाठीही पाणी मिळणे कठीण झाले आहे. पुणे जिल्ह्यातील धरणांमध्ये केवळ ६७ तक्के पाणी साठा शिल्लक आहे. पुणे जिल्ह्याप्रमाणे इतर जिल्ह्यातही हीच परिस्थिती आहे. मराठवाडा आणि विदर्भात तर परिस्थिती आणखी बिकट आहे तिथे आताच दुष्काळाच्या झळा जाणवू लागल्या आहेत. मराठवाड्यात अनेक मोठ्या प्रकल्पात पाणी साठा संपत आला आहे. राज्यातील सर्व धरण साठ्यातही सरासरी साठ ते सत्तर टक्केच पाणी साठा



शिल्लक आहे. पाणी साठा कमी होत असल्याने काही प्रमुख शहरात पाणी कपातीस सुरुवात झाली आहे . राज्यातील काही गावात तर दहा दिवसांतून एकदा पाणी सुटत आहे. अनेक गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे. पाण्यासाठी दाही दिशा अशी लोकांची अवस्था झाली आहे. पाणी मिळत नसल्याने नागरिक हैराण झाले आहेत. राज्यातील अनेक तालुक्यात पाण्याची पातळी खालावली आहे. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत आहे. पाण्यासाठी नागरिकांवर दाही दिशा फिरण्याची वेळ आली आहे. मुकी जनावरे आणि पक्षांना देखील पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. डिसेंबर महिन्यात ही अवस्था असेल तर एप्रिल मे महिन्यात काय अवस्था असेल याचा विचारही करवत नाही. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडेल असा हवामान खात्याने आणि स्कायमेटने वर्तवलेला अंदाज खरा ठरला. यावर्षी पाऊस कमी झाल्याने पाण्याचे मोठे संकट उभे ठाकले आहे. शिवाय यावर्षी पावसाचे आगमन उशिरा झाले. काही भागात तर पाऊसच पडला नाही त्यामुळे यावर्षी दुष्काळाचे संकट आणखी गडद होऊ शकते. हे संकट टाळायचे असेल तर आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन केले पाहिजे. उपलब्ध पाण्याचा अंदाज घेऊन त्याच्या वाटपाचे नियोजन केले पाहिजे. पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात आजही २४ तास पाणी पुरवठा केला जातो. २४ तास पाण्याची चंगळ असल्याने कदाचित त्यांना पाण्याचे महत्व माहीत नसेल. पुण्या - मुंबई सारख्या शहरातील काही बेजबाबदार घटक पुरेसे पाणी मिळाल्यानंतर पाण्याची नासाडी करताना दिसतात. नळ खुले सोडून पाणी वाया घालवीत असतात. या शहरातील अनेक ठिकाणी पाण्याची नासाडी होताना दिसते. त्यामुळे या भागातही आवश्यक तितकेच पाणी सोडायला हवे. पुणे महानगरपालिकेने गेल्या वर्षी आठवड्यातून एक दिवस पाणी कपात करण्याचा निर्णय घेतला होता यावर्षीही पुणे महानगर पालिकेने तसाच निर्णय घ्यायला हवा त्यामुळे पुणेकरांना पाणी बचतीची सवय लागेल. मुंबई महानगरपालिकेनेही असा निर्णय घ्यायला हवा. लोकांनी पाणी जपून वापरायला हवे. भविष्यातील पाण्याचे संकट गांभीर्याने घेऊन पाण्याचा अपव्यय टाळला आणि काटकसरीने वापर केला तर पाऊस पडेपर्यंत वेळ निभावून नेता येईल. पाणी हेच जीवन आहे. थेंब न थेंब पाण्याची बचत केली पाहिजे. पाण्याची बचत करूनच आपण पाण्याची निर्मिती करू शकतो. पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे ही काळाची गरज आहे.

# एमबी बुक मंजुरी, कामपूर्तता प्रमाणपत्रासाठी १ लाख ८० हजारांची लाच

## नगर पालिका अभियंता, लिपीक, पर्यवेक्षक, शासकीय ठेकेदार एसीबीच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल वासनिक**

**यवतमाळ :** नगरपरीषद सार्वजनिक शौचालय रिपेअरिंग कंत्राट बिलाचे एम बी बुक मंजुर केल्याचा मोबदल्यासाठी १ लाख ६० हजार रुपये वयवतमाळ नगरपरिषद येथे केलेल्या वेगवेगळया कामाचे वर्कींग हॅन्ड ॲन्ड इन, कामपुर्तता प्रमाणपत्र देण्याकरीता २० हजार रुपये असे एकुण १ लाख ८० हजार रुपयाची लाच ठेकेदाराला मागण्यात आली होती. ठेकेदाराने अ मरावती येथील लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अमरावती यांच्याकडे तक्रार दिली होती. त्यावरुन एसीबीच्या पथकाने दोन ठिकाणी धाडी टाकुन नगर पालिका अभियंता, लिपीक, पर्यवेक्षक, शासकीय ठेकेदाराला रंगेहात पकडले. आज १४ डिसेंबर रोजी ही कारवाई केली असून, नगर परिषद वर्तुळात चांगलीच खळबळ उडाली आहे. निखिल प्रताप पुराणिक वय ३३ वर्ष पद-स्थापन्य अभियंता, वर्ग-३ बांधकाम विभाग, नगर परीषद यतवतमाळ, रा. सहकार नगर, रेणुका अर्पाटमेट, दुसरा माळा यवतमाळ , शेख साजीद शेख वाजिर वय ३५ वर्ष पद- कनिष्ठ लिपीक वर्ग-३ बांधकाम विभाग, नगर परीषद यतवनमाळ रा. सव्वालाखे लेआऊट भोसा यवतमाळ, शताक्षी सुरेश उभाळकर (कांबळे) वय २७ वर्ष पद- उद्यान पर्यवेक्षक, वर्ग-३ बांधकाम विभाग, नगर परीषद यतवतमाळ रा. सुवर्ण नगर, वाघापुर यवतमाळ, सतिश विठठलराव जिवणे वय ५२ वर्ष पद-शासकिय ठेकेदार बांधकाम विभाग, नगर परीषद यतवतमाळ रा. आंबेडकर चौक पाटीपुरा यवतमाळ अशी लाच मागणारे व घेणा-यांची नावे आहे. अभियंता पुराणिक यानी तकारदार यांचे नगरपरीषद सार्वजनिक शौचालय रिपेअरिंग कंत्राटाचे ८,००,०००/-रूपये चे बिलाचे एम बी बुक मंजुर केल्याचा मोबदला म्हणुन १,६०,००० मागणी केली होती. तर कनिष्ठ लिपीक शेख साजीद आणि उद्यान पर्यवेक्षक शताक्षी उभाळकर यानी यवतमाळ नगरपरिषद येथे केलेल्या वेगवेगळया कामाचे वर्कींग हॅन्ड ॲन्ड इन / कामपुर्तता प्रमाणपत्र देण्याकरीता २०,००० रुपयाची मागणी केली होती. या संदर्भात तक्रारदार ठेकेदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांच्याकडे तक्रार दिली होती. पडताळणी दरम्यान आज १४ डिसेंबर रोजी पथकाने आझाद मैदान व नगर परिषद कार्यालयात सापळा रचला. यामध्ये शासकीय ठेकेदार सतिश जिवणे यानी लाचेची रक्कम स्विकारली. या प्रकरणी पो स्टे यवतमाळ शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरु आहे. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक मारुती जगताप लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र अमरावती, अपर पोलीस अधीक्षक देविदास नेवारे , ला.प्र. वि.अमरावती परीक्षेत्र, अमरावती, घटक प्रमुख, पोलीस उपअधिक्षक मिलींदकुमार बहाकार, ला.प्र.वि.अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक केतन मांजरे, पोलीस निरीक्षक चित्रा मेसरे, पो.नि. अमित वानखडे ला.प्र.वि. यवतमाळ व.पो.कॉ, आशिष जांभोळे ला.प्र.वि. अमरावती, पो.कॉ वैभव जायले ला.प्र.वि. अमरावती चालक सतिष किटुकले ला.प्र.वि. अमरावती यांनी केली.



## संजय कुलकर्णी गटविकास अधिकारी रुजू

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** गेल्या वर्षभरात तीन वेळा पैठण पंचायत समितीचा कारभार प्रभारी गटविकास अधिकार्याकडे होता. त्यामुळे ग्रामपंचायत स्थरावर आनेक कामे विलंबाने होत असत,वर्षेभरात तीन प्रभारी अधिकारी गटविकास आले आणि गेले ,आता नव्याने शुक्रवारी पैठण पंचायत समितीचा गटविकास अधिकारी म्हणून पदभार घेतलेले संजय कुलकर्णी हे याच पंचायत समितीत काही वर्षे काम केलेले असल्याने कुलकर्णी यांनी पदभार घेतला त्याप्रसंगी पैठण तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने स्वागत करण्यात आले यावेळी मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष रमेश लिंबोरे, अनिल मेहत्रे,रमेश शेळके,मनोज खुटेकर, शिवाजी गाडे, दादासाहेब घोडके यांची उपस्थिती होती.

## जिल्हा क्रीडा संकुलात क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे , जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय जळगाव आयोजीत दि १२ ते १८ डिसेंबर क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी सॉफ्टबॉल चे आंतरराष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक तथा शिवछत्रपती पुरस्कार विजेते किशोर चौधरी यांच्या हस्ते भारताचे हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष जळगाव जिल्हा तायक्वांडो असोसिएशनचे सचिव अजित घारगे यांनी भूषविले. उपस्थित सर्व क्रीडा शिक्षकांना जळगाव जिल्हा क्रीडा कार्यालयाचे अधिकारी सुजाता गुल्हाणे यांच्या हस्ते पुस्तक व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. क्रीडा अधिकारी सुजाता गुल्हाणे यांनी जिल्हात विविध शाळा कॉलेज या ठिकाणी सुरू असलेल्या क्रीडा स्पर्धेची माहीती दिली. शिवछत्रपती पुरस्कार विजेते किशोर चौधरी यांनी उद्घाटन मनोगतातून खेळाडूना शुभेच्छा दिल्या. सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय पहूर शाळेचे क्रीडा शिक्षक हरीभाऊ राऊत यांनी खेळाडूना मार्गदर्शन केले. या प्रंसगी क्रीडा शिक्षक श्रीकृष्ण चौधरी, राजेंद्र जंजाळे , सुनिल मोरे, जयेश बाविस्कर, जीवन महाजन यांच्या सह विविध शाळेचे क्रीडा शिक्षक तायक्वांडो कोच उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करणाऱ्या नराधमास मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** बाफन विहीर ता. त्र्यंबकेश्वर येथील अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करणाऱ्या नराधमास जिल्हा न्यायालयाने मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे.

दि.१३ डिसेंबर रोजी नाशिक जिल्हा सत्र जिल्हा न्यायाधीश श्रीमती मृदूला भाटीया यांचे न्यायालयात हरसुल पोलीस ठाणे गु.र.नं. २१/२०१८ भा.द.वि कलम ३७६,३६३, ४५२,५०४,५०६ सह लहान मुलांचे लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ चे कलम ४ व ८ प्रमाणे दाखल खटल्याची सुनावणी पुर्ण होवून सदर गुन्ह्यातील आरोपी रमेश चंदर पागी, वय ४८, रा. बाफन विहीर, ता. त्रंबकेश्वर याचे विरूध्द आरोप सिध्द झाल्याने मा.न्यायालयाने सदर आरोपीस भा.द.वि कलम ३७६ व लहान मुलांचे लैंगिक अत्याचार अधिनियम २०१२ चे कलम ६ खाली जन्मठेपेची (मरेपर्यंत) शिक्षा व १० हजार रू. दंड याप्रमाणे शिक्षा सुनावली आहे. सदरची घटना दि.०१ मार्च २०१८ रोजी रात्रौ १० वा.चे दरम्यान त्रंबकेश्वर तालुक्यातील बाफन विहीर शिवारात घडली होती. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे रमेश चंदर पागी याने यातील पिडीत अल्पवयीन मुलगी वय १४ वर्षे २ महिने हिस तिचे घरात घुसून, तीचे तोंड दाबून, तीस घरातुन पळवून नेवून दमदाटी शिवीगाळ करून तीचेवर बळजबरीने बलात्कार केला होता. सदर गुन्ह्यातील आरोपीस हरसुल पोलीसांनी अटक केली होती. सदर गुन्ह्याचा तपास हरसुल पोलीस ठाणेचे तत्कालीन सहा.पोलीस निरीक्षक पी.पी. साळुंखे यांनी केला होता. त्यांनी आरोपीविरूध्द भक्कम पुरावे गोळा करून मा. सत्र न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्रीमती रेश्मा जाधव यांनी तसेच पैरवी अधिकारी म्हणुन पो.हवा गणेश वराडे यांनी काम पाहीले असून आरोपीविरूध्द गुन्हा शाबीत झाला आहे. सदर गुन्ह्यातील तपास पथकाने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक शहाजी उमाप यांनी तपासी अंमलदार स.पो.नि पी.पी.साळुंखे यांना ५ हजार रू तर कोर्ट पैरवी अधिकारी पो.हवा. गणेश वराडे यांना २ हजार रू.असे बक्षीस घोषित करून त्यांचे अभिनंदन केले आहे.



## नांदेड जिल्हाधिकारी प्रमोद नलावडे यांनी घेतले सपत्नीक रेणुका माता देवीचे दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील दैवत भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रेणुकामाता देवी मंदिर येथे नांदेड येथील जिल्हाधिकारी मा.प्रमोद नलावडे यांनी सपत्नीक देवी चे दर्शन घेवून येथील विश्वस्तांसी भेट घेवून चर्चा केली. यावेळी विश्वस्त भिक्कन पाटील घुले( दादा), चेअरमन किशोर नलावडे, आसाराम नाना,नामदेव नलावडे यांनी जिल्हाधिकारी नलावडे यांचे शॉल देवून सत्कार केला व विश्वस्त तथा गावा व विकास संदर्भात चर्चा केली.श्री रेणुका माता मंदिर परिसर विकासात्मक तथा स्वच्छता सुंदरता बद्दल कौतुक केले.

## पावसाळ्यात शून्य तर अवकाळी पावसाने बारा टक्के पाणीसाठ्यात वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** यंदा खुलताबाद तालुक्यात पावसाळ्यात सरासरीच्या अर्धेही (पर्जन्यमान) पाऊस झाला त्यामुळे नदी नाले ओढे तलाव विहिरी यांनाही पाणी आले नाही मात्र अवकाळीने दि.२६ते३०नोव्हेंबर मुसळधार पावसामुळे तालुक्यात ठिकठिकाणी नदी नाले ओढे यांना पूरपाणी आले व त्यामुळे प्रकल्प तलाव विहिरींच्या पाणी साठ्यात वाढ झाली असल्याचे चित्र आहे. तालुक्यातील मोठा व महत्वाचा प्रकल्प गिरिजा मध्यम प्रकल्प येसगाव धरणात गत चार महिन्यांच्या पावसाळ्यात एक टक्के ही पाणी साठ्यात वाढ झाली नाही. व या उलट प्रकल्पात १९%टक्के पर्यंत पाणी साठा खाली आला होता. यात दि.२६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान तीन ही महसूल मंडळ बाजार सावंगी सुलतानपूर वेरुळ मधे अवकाळीचा मुसळधार पाऊस झाला मात्र बाजार सावंगी मंडळ मधे सर्वाधिक१५०मिमी पाऊस झाला तर सुलतानपूर मंडळ मधे ९९मिमी व वेरुळ मंडळ मधे ८०मिमी दरम्यान पाऊस झाला यात उगमाच्या ठिकाणी म्हैसमाळ लामणगाव टाकळी राजेराय लगत जोराचा मुसळधार पाऊस झाल्याने फुलमस्ता तुडुंब भरून वाहेली तर एकदोन दिवस पूर पाणी सुरु होता त्यामुळे गिरीजा मध्यम प्रकल्प येसगाव धरणात १२%टक्के पाणी साठ्यात वाढ होवून प्रकल्पांत १९ वरून वाढून ३०-३१ टक्के पाणी साठा झाला आहे.तर गंधेश्वर प्रकल्प, दरेगाव तलावाच्या पाणी साठ्यात वाढ झाली आहे.व ठिकठिकाणी केटी कोल्हापूर बांध, सिमेंट बांध,नाले,नद्या, विहिरींच्या पाणी साठ्यात वाढ झाली आहे.अवकाळी मुसळधार पावसामुळे रब्बी ची दुबार पेर करावी लगत असले तरी मुसळधार पाऊस रब्बी पिकांसाठी फायद्याचा ठरणार आहे.



# सिटी सर्व्हे नंबर 7 मध्ये अतिक्रमण करून घराचे बांधकाम सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शहरातील गावठाण हद्दीतील सिटी सर्व्हे नंबर 7 मध्ये बळजबरीने अतिक्रमण करून घराचे बांधकाम करत आहे, या विरोधात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार देण्यात आली असून तरी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व बांधकाम विभागाचे अभियंता जाणुन बुजुन दुर्लक्ष करत आहे.

सिटी सर्व्हे नंबर 5 मध्ये परवानगी असली तरी सिटी सर्व्हे नंबर 7 मध्ये घराचे बांधकाम केले जात आहे.
या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांना विचारले असता तर ते उडवा उडवीची उत्तरे देत हात झटकून घेत आहे.
बांधकाम करण्याचा परवाना एकीकडे, बांधकाम सुरू दुसरीकडे असा प्रकार सुरू आहे.
फुलंब्री नगरपंचायतीच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून अतिक्रमण केलेल्या जागेवर घराचे बांधकाम केले जात आहे.
याविरोधात संबंधित जागेचे मालक सुभान बुर्हाण पटेल, तमीजबी रहेमान पटेल, वाहब बुर्हाण पटेल, फरजाना नवाज पटेल यांनी दोन महिन्यांपूर्वी व आता 8 डिसेंबर रोजी नगरपंचायत मध्ये तक्रार केली होती तरी कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही.
यासाठी घराचे बांधकाम थांबवुन कारवाई नाही केल्यास नगरपंचायत कार्यालय समोर उपोषणाला बसु असा इशारा संबंधित सुभान बुर्हाण पटेल यांच्या कुटुंबीयांनी दिला आहे.

# बाबरा ते कान्होरी रस्त्याचे काम निकृष्ट

## ठेकेदारांना काळ्या यादीत टाका : रिपाइंचे आंदोलन सुरू

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** तालुक्यातील बाबरा ते कान्होरी अंदाजे दहा किलो मीटर अंतराचे काम चालू असल्याचे दिसून येत आहे.
यामध्ये निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याने या विरोधात कारवाई करावी अशी मागणी साठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने फुलंब्री तालुका सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात आले. तसेच या मागणीसाठी या पुर्वी औरंगाबाद विभागीय आयुक्त, औरंगाबाद जिल्हाधिकारी, औरंगाबाद जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता तसेच फुलंब्री तहसीलदार यांच्या कडे आपल्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले.
तसेच दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फुलंब्री तालुक्यातील बाबरा ते कान्होरी या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे सुरू आहे, संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात यावा. संबंधित विभागाचे अधिकारी आर्थिक लालसेपोटी दुर्लक्ष करत असुन ठेकेदार मनमानी कारभार करत आहे. रोडच्या कडेला पंख्याला नाल्या लगतची माती टाकून देत आहे. ठेकेदार मनमानी कारभार करत आहे ते निकृष्ट दर्जाचे काम करत आहे. काळ्या यादीत टाकुन कारवाई करावी अशी मागणी फुलंब्री तालुका रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ए पक्षाच्या वतीने करण्यात येत आहे. उपोषण करताना रिपाईचे महिला तालुका अध्यक्ष पुष्पा मोरे, मंगेश गुंजाळ, शहराध्यक्ष भगवान गंगावणे , शहर उपाध्यक्ष रंजीत वाहुळ यांच्या सह आदींची उपस्थिती होती. निकृष्ट दर्जाचे काम होत असेल तर चौकशी नंतर सिद्ध होईल. या कामाच्या संदर्भात ठेकेदाराला दैनिक आत्ताच एक्स्प्रेस प्रतिनिधी सरफराज पटेल यांनी संपर्क साधुन माहिती घेतली असता तर ठेकेदार अजीम सिद्दीकी म्हणाले की, या कामाच्या संदर्भात तक्रार असेल तर चौकशी नंतर सिद्ध होईल की निकृष्ट दर्जाचे आहे की नाही.



# नागपूर विधान भवनावर लोककलावंत शाहिरांचा धडक मोर्चा : शाहीर गायकर

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** महाराष्ट्रातील लोककलावंत शाहिरांच्या मोर्चाला नागपूरच्या यशवंत स्टेडियम पासून सुरुवात झाली . नागपूर विदर्भ पश्चिम महाराष्ट्रतुन महिला , पुरुष लोककलावंत शाहीर मोर्चात सहभागी झाले होते. वृद्ध कलावंतांच्या मानधनात वाढ झालीच पाहिजे ! कलाकारों की मांगे पुरी करो नही तो खुर्ची खाली करों ! हम सब कलाकार एक है ! अशा घोषणा देत विधानभवनावर मोर्चा धडकला . विविध संस्थांच्यावतीने लोककलावंत व शाहीर यांचे हितासाठी मागण्यांच्या घोषणा देण्यात आल्या.
यामध्ये वृद्ध कलावंतांच्या मानधनात रकमेत वाढ करून १०,००० हजार मिळावे, जिल्हा समितीमध्ये फक्त वार्षिक १०० मानधन प्रकरणे मंजुरीस असतात त्या मानधन प्रकरणाची संख्या ५०० ऐवढी करावी. कारण मागील शेकडो प्रकरने प्रलंबित आहेत. वृद्ध कलावंत वयोमर्यादा कमी करावी. कारण आयुष्यभर प्रवास व अनियमितता अशा कारणाने वृद्धत्व लवकर येते. इनकम सर्टिफिकेट ४८ हजार रुपये वरून २ लाख रुपये करण्यात यावे. सर्व शाहीर कलाकार यांना प्रात्यक्षिक सादर करून मूळ कागदपत्र तपासूनच मानधन अर्ज स्वीकार करावे. जेणेकरून खऱ्या शाहीर लोककलाकारावर अन्याय होणार नाही . याची विशेष काळजी घ्यावी. वृद्ध कलावंतास शासनाकडून सर्व आरोग्यसेवा मोफत मिळव्यात. याबाबत आधार कार्ड प्रमाणे वेगळे शासनमान्य ओळखपत्र शिखर संस्था सभासद कलावंतास द्यावे .वृद्ध कलावंत मानधन रक्कम कलावंतांच्या बँक खात्यात जमा व्हावी. त्यात दर महिन्यात अथवा तिमाहीत नियमितपणा असावा . लोककलावंत शाहीर यांना घर बांधकामास बँक तर्फे संपूर्ण बिनव्याजी शासन शिफारशीने कर्ज मिळावे . त्यांचे हक्काचे घर होण्याचे स्वप्न पूर्ण होईल. वृद्ध कलावंतांच्या मुला मुलींच्या शिक्षणाचा खर्च शासनानेच करावा. सांस्कृतिक कार्य विभागाप्रमाणेच कलावंत व वृद्ध कलावंत सहाय्य विभाग असा स्वतंत्र शासनाचा विभाग असावा. सदर विभाग सांस्कृतिक आणि सामाजिक न्याय विभागाशी संलग्न असावा. सर्व कलावंतास एसटी व रेल्वे प्रवास संपूर्ण मोफत म्हणजे विना शुल्क असावा तसेच आमदार , पत्रकार याप्रमाणे कलाकार नामांकन राखीव असावे. जो त्यांच्या सेवेचा गौरव आहे. कलावंतांना प्रवास करताना सोबत एक व्यक्ती विनाश शुल्क अशी व्यवस्था असावी. कलावंत सहाय्य विभागाचे कलावंत संख्या जास्त असलेल्या जिल्ह्यात एक कार्यालय असावे. कलाकारास अपघात विमा मिळावा . शेतकरी मित्र अपघात विमाप्रमाणे कलावंतांस ही विमा सुविधा मिळाव्यात. भारत सरकार व महाराष्ट्र शासन मान्य कलावंतांचे कार्यक्रम कमी करून डिजिटल व्हॅन, डिजीटल जाहिरातींवर खर्च न करता लोककलावंतांना शासनाच्या विविध योजनांचे जनजागृतीचे कार्यक्रम द्यावेत.

शाहीर कलावंतांचे मागण्याचे निवेदन सांस्कृतिक कार्यमंत्री माननीय सुधीरजी मुनगट्टीवार यांना विधान भवनात शाहीर उत्तम गायकर, राजेंद्र बावनकुळे यांच्या शिष्ट मंडळाने दिले .याप्रसंगी सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी मिश्किल टिप्पणी केली .माझ्या नावातच धीर आहे लोककलावंतांनी शाहीरांनी थोडा धीर धरावा. चालू अधिवेशनात आपल्या सर्व मागण्यावर परिपूर्ण विचार केला जाईल. वृद्ध कलावंतांच्या मानधनात वाढ निश्चित केली जाईल अशी ग्वाही मा सांस्कृतिक मंत्री यांनी दिली. व निवेदन स्वीकारले या लोककलावंत शाहिरांच्या मागण्यासंदर्भात नेहमी लोककलावंतांच्या न्याय हक्काला वाचा फोडणारे मंत्रालयाचे पत्रकार माननीय खंडुराजजी गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य लाभले. लोककलावंत शाहिरांचा मोर्चा शांततेत पार पडला.

# जिल्हास्तरीय नवोदय सराव परीक्षेत गुणवंतांचा सत्कार

## २१ मुलांना प्रोत्साहनपर बक्षीस

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** जवाहर नवोदय परीक्षेची पूर्वतयारी म्हणून विद्यार्थ्यांच्या मनातील परिक्षेची भिती व संभाव्य चुका टाळण्यासाठी नवोदय परिक्षेमध्ये उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवणारी तालुक्यातील एकमेव क्लासेस म्हणुन सन्मानित सफल गुरुकुल व नवोदय क्लासेसच्या वतीने दहा डिसेंबर रोजी श्री शिवाजी हायस्कूल येथे लोणार येथील सफल गुरुकुल नवोदय क्लासेस चे अध्यक्ष शेख नासीर सर संचालिका शेख साजदा मॅडम यांच्या वतीने सराव परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.
या परीक्षेमध्ये बुलढाणा जिल्ह्यासह शेजारी जिल्ह्यातील जालना, वाशिम, परभणी, हिंगोली, उस्मानाबाद धाराशिव, बीड एकूण साडेसहाशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या सराव स्पर्धेत प्रथम,द्वितीय,तृतीय ते दहावे क्रमांक प्राप्त मुलांना बक्षीस रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन तसेच २१ मुलांना प्रोत्साहन पर बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.परीक्षेत प्रथम पारितोषिक आदर्श व्यवहारे, द्वितीय अर्णव कडेकर,तृतीय हार्दिक कवडे,चतुर्थ रितवी गव्हाणे, पाचवे अनुष्का वानखेडे, सहावे स्वराज निर्वळ,सातवे पार्थ पुंड, आठवे सुशांत सुर्वे आणि कृष्णा भोयर नऊ वे प्रशांत आरू दहावे शौर्य ठाकरे देण्यात आले व उर्वरित प्रोत्साहन पर २१ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.या सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शेख कठठू भाई अल्पसंख्यांक समिती अध्यक्ष परतुर,प्रमुख अतिथी शरद आहेरे साहेब पोलीस उपनिरीक्षक मेहकर,अभिमान बायस सर तळणी व अशोक भावसार यांनी उपस्थिती दर्शवली.



# मेळघाटात ‘सामान्य बाज’ पक्ष्याची प्रथमच नोंद

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** सुमारे दीडशे वर्षांपूर्वी मेळघाटच्या जंगलात पक्षी अभ्यासाची सुरुवात झाली होती. त्यानंतर वेगवेगळ्या काळात झालेल्या अभ्यासातून आजवर ३०४ पक्ष्यांची नोंद झालेली आहे. या यादीत सामान्य बाज (कॉमन बझार्ड) या पक्ष्याची नव्याने भर पडली असून हा दुर्मिळ पक्षी नुकताच मेळघाट व्याघ्र प्रकल्पात आढळून आला. मेळघाटात नुकतेच बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे चार दिवसीय निसर्ग शिबीर पार पडले. शिबिरात सहभागी व तज्ज्ञ मार्गदर्शक हे अकोट वन्यजीव विभागात जंगल भ्रमंतीवर असताना धारगड भागात सामान्य बाज हा दुर्मिळ पक्षी आढळून आला. पक्षी अभ्यासक तथा मानद वन्यजीव रक्षक डॉ. जयंत वडतकर, निसर्ग संरक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. डॉ. निशिकांत काळे, बीएनएचएसचे अभ्यासक नंदकिशोर दुधे, पक्षीमित्रचे अमोल सावंत व शिबिरार्थींना हा पक्षी एका वाळलेल्या झाडाच्या खोडावर बसलेला आढळून आला. त्याचे निरीक्षण केले असता तो शुभ्रनयन तिसा या प्रजातीपेक्षा वेगळा वाटल्याने त्याचे थांबून सखोल निरीक्षण केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद





# हरण्यामाळचे पाणी नकाणे तलावात तातडीने सोडण्यात यावे : आ.फारुख शाह

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नकाणे तलाव निव्वळ १२एम.सी.एफ.टी. पाणीसाठा शिल्लक आहे. नकाणे तलाव आटल्यामुळे शहराच्या काही भागाला पाणी पुरवठा करणे जिकरीचे होईल म्हणून आताच पाऊले उचलणे गरजेचे आहे. त्यासाठी तातडीने हरण्यामाळ प्रकल्पातून नकाणे तलावात किमान ५० एम.सी.एफ.टी. पाणी सोडण्यात यावे असे आ.फारुख शाह यांनी आजच्या नकाणे तलाव पाहणी दौऱ्यात प्रतिपादन केले. यावेळी आयुक्त अमिता दगडे पाटील, मनपा कार्यकारी अभियंता नवनीत सोनवणे,कनिष्ठ अभियंता चंद्रकांत उगले,जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता व्हट्टे ,उपअभियंता विवेक महाले,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चे उपअभियंता वानखेडे,पाटील नगरसेवक नासिर पठाण,नगरसेवक सईद बेग,कैसर अहमद,आसिफ शाह, जाहिद हाजी आदी उपस्थित होते.यावेळी आ.फारुख शाह यांनी मनपा प्रशासनाला आदेश दिले की येत्या पंधरा दिवसात शहरातील अंतर्गत पाणी पुरवठा पाईप लाईनचा प्रश्न मार्गी लावावा तसेच वलवाडी ला करण्यात येणारा पाणी पुरवठा अक्कलपाडा योजनेला जोडण्यात यावा.

# गोंदियात यंदा ज्वारीचा बोलबाला

आधुनिक केसरी न्यूज

**गोंदिया :** जिल्ह्यात धान व दुसऱ्या क्रमांकावर गहू हीच पारंपरिक पीक आतापर्यंत चालत आली असून, शेतकरी अन्य पिकांकडे वळताना फारसा दिसत नव्हता. मात्र, आता धान शेती धोक्याची झाली असल्याने शेतकरी त्याला पर्याय म्हणून अन्य पिकांकडे आकर्षित होत आहे. हेच कारण आहे की, जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गव्हाला बगल देत यंदा ज्वारी हाती घेतल्याचे दिसत आहे.

यंदा सर्वसाधारण क्षेत्रापेक्षा अधिक क्षेत्रात शेतकऱ्यांनी ज्वारीची लागवड केली आहे. जिल्ह्यातील शेतकरी फक्त धान शेतीलाच प्राधान्य देतो. आजही बहुतांश शेतकरी धान लागवडच करीत असून, दोन्ही हंगामात त्यांनी धान लावायचे हे ठरवूनच ठेवले आहे. मात्र, धान शेती नेहमीच धोक्याची राहिली असल्याचा इतिहास चालत आला आहे. हेच कारण आहे की, आजपर्यंत येथील शेतकरी समृद्ध झाला नाही. निसर्ग नेहमीच शेतकऱ्यांना झोडपून काढत आला आहे. यंदाही अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिसकावून नेला आहे. वारंवारचा हा धोका बघता शेतकऱ्यांनी अन्य नगदी पिकांकडेही वळावे यासाठी कृषी विभागाकडून नवनवे प्रयोग केले जात आहेत. याचा काही प्रमाणात फायदा आता दिसून येत आहे. कारण, जिल्ह्यातला शेतकरी आता धानासोबतच अन्य पिकांकडे वळताना दिसत आहे. या रब्बी हंगामातच त्याची प्रचिती येत असून, फक्त धान आणि गव्हाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांनी यंदा गव्हाला बगल दिल्याचे दिसत आहे. यंदा जिल्ह्यात २२३२.०७ हेक्टर गव्हाचे सर्वसाधारण क्षेत्र असून, त्यातील ५३३.१० हेक्टरमध्येच शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष पेरणी केली आहे, तर ज्वारीचे ४३५.६० हेक्टर सर्वसाधारण क्षेत्र असून, शेतकऱ्यांनी चक्क ५३५.८९ हेक्टरमध्ये ज्वारीची प्रत्यक्ष पेरणी केली आहे. यावरून यंदा जिल्ह्यात ज्वारीचाच बोलबाला दिसून येत आहे.ज्वारीमध्ये फायबर, प्रोटीन, कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम, आयर्न, फॅच आणि अँटी ऑक्सीडंट तत्त्व भरपूर प्रमाणात असतात. यामुळे ज्वारी खाल्ल्याने हाडांना मजबुती मिळते, ज्वारी लठ्ठपणा कमी करण्यास मदत करते, मधुमेहात ज्वारी फायदेशीर ठरते.

# शेतीच्या वादातून बापलेकाची हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** मेहकर तालुक्यातील सोनाटी येथे शेतीच्या वादातून दोघा बापलेकाची हत्या करण्यात आली होती. या हत्येप्रकरणी दोघा आरोपींना मेहकर न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा ठोठावली आहे. न्यायाधीश एस. एम. चंदगडे यांनी दोघा आरोपींना कठोर शिक्षा सुनावली असून तीघांची पुराव्याभावी सुटका करण्याचे आदेश दिले आहे. फिर्यादी जयश्री अशोक सोनटक्के यांचे सासरे दिगंबर सोनटक्के आणि पती अशोक सोनटक्के हे ११ एप्रिल २०१९ रोजी सोनाटी येथील शेतात ट्रॅक्टरने नांगरणी करत होते. दरम्यान, बबन वैजिनाथ सोनटक्के, प्रकाश वैजिनाथ सोनटक्के, नंदा बबन सोनटक्के, चंद्रकला प्रकाश सोनटक्के, संदिप प्रकाश सोनटक्के यांनी कुऱ्हाड आणि लाठीने त्यांचे सासरे व पतीस मारहाण केली. दिगंबर सोनटक्के व अशोक सोनटक्के यांना जखमी अवस्थेत मेहकर येथे रुग्णालयात भरती केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. गुन्हा दाखल झाल्यावर उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने यांनी दोषारोपपत्र दाखल केले.

# उपविभागीय अधिकारी कार्यालयावर मातंग समाजाचा विराट मोर्चा

## हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा : साहेबराव पाटोळे

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** मातंग समाजाच्या मागण्या शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सोशल फोरमचे संस्थापक तथा उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी विजयजी अंभोरे यांच्या मार्गदर्शनाखाली साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सोशल फोरमचे, प्रदेशाध्यक्ष महा. राज्य साहेबराव दशरथ पाटोळे यांच्या नेतृत्वात साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे सोशल फोरम बुलढाणा जिल्हा (दक्षिण) च्या विद्यमाने मातंग समाजाच्या मागण्यासाठी उपविभागीय अधिकारी मेहकर कार्यालयावर मातंग समाजाचा विराट मोर्चाचे आयोजन बुधवार दि.२०/१२/२०२३ रोजी शिवाजी पार्क, सा. अण्णाभाऊ साठे पुतळ्या जवळ, मेहकर करण्यात आले आहे.



वाजंत्री वाजविणे हा मातंग समाजाचा पारंपारीक व्यवसाय असून तो अनेक परिवाराचे उपजिविकेचे साधन आहे. परंतू डिजेचे प्रमाण अतिशय वाढल्यामुळे बैंड वाद्याच्या व्यवसायावर परिणाम झाला परिणामी बैंड कलावंतावर उपासमारीची पाळी आली आहे. त्यामुळे डिजेवर पुर्णपणे बंदी घालण्यात यावी तसेच बँडवाद्य मालक व कारागिर यांना कलावंतांचा दर्जा देऊन त्यांना वृध्द कलावंत मानधन सुरू करण्यात यावे.अनुसुचित जातीच्या आरक्षणाचे अ ब क ड वर्गीकरण करण्यात यावे,लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाच्या शिफारशी लागू करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे चिराग नगरी मुंबई वक्रांतिगुरू लहुजी साळवे संगमवाडी पुणे येथील स्मारक उभारण्यात यावे. अ जा च्या अ ब क ड वर्गीकरणा करिता शहीद झालेल्या स्व. अंकुश खंदारे रा. नायगांव बु. ता चिखली जि बुलढाणा यांच्या कुटूंबांना दहा लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी. बैंड मालक व कलाकार यांना कलावंतांचा दर्जा देऊन त्यांना वृध्दकलावंत योजने मार्फत मानधन देण्यात यावे. अनुसुचित जातीला मिळणाऱ्या सर्व योजनेत रमाई आवास योजने प्रमाणे मातंग समाजा करिता स्वातंत्र्य वाटा आरक्षित ठेवण्यात यावा. रमाई आवास योजने अंतर्गत मंजूर असलेले उध्दीष्ट पूर्ण करण्यात यावे. ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागात सुध्दा शासकिय भुखंडावर रमाई आवास योजनेचे घरकुल बांधून देण्यात यावे. लोणार शहरात शासकिय खर्चाने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात यावे. भुमीहीन अतिक्रण धारकांना जमीनीचे पट्टे देण्यात यावे.अतिक्रमीत जागेत जे नागरीक वास्तव्य करून राहत आहेत त्यांना मालकी पट्टे बहाल करण्यात यावे. डिजेवर पुर्णपणे बंदी घालण्यात यावी.दादासाहेब गायकवाड सबलीकरण योजने करिता निधी वाढवून देण्यात यावा. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळा अंतर्गत एन.एस.एफ. डी. सी. योजना पुर्ववत सुरू करण्यात यावी. शिधा पत्रिका असून सुध्दा शासकिय योजनेचे धान्य मिळत नाही अशा गरिब कुटूंबांना धान्याचा लाभ देण्यात यावा. ग्रामिण भागात प्रत्येक गावातमध्ये मातंग समाजाकरीता स्वतंत्र स्मशानभुमीकरीता जागा देण्यात यावी. बँड पथकातील वाहनांना जाचक अटितुन सुट देण्यात यावी.अशा विविध मागण्या मोर्चाच्या वतीने शासनाच्या निदर्शनास आणून दिले जाणार असून तरी मातंग समाज बंधू आणि भगिनिंनी या मोर्चामध्ये बहुसंखेने सहभागी व्हावे असे आवाहन गजानन साठे,दत्तात्रय बोरकर सकल मातंग समाजच्या वतीने करण्यात आले आहे.

# हाडाखेड चेक पोस्टजवळ पोलिसांकडून लाखोंचा गुटखा जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** नवीन नियुक्त पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या आदेशावरून अनेक पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दैनंदिन कारवाई सुरूच आहेत अशीच एक मोठी कारवाई शिरपूर पोलीस स्टेशन हद्दीत केली आहे हडाखेड चेक पोस्ट नाक्याजवळ गुटख्याने भरलेला एक मोठा कंटेनर पकडून 62 लाख मुद्देमाल सहित आरोपी ताब्यात.

मा पोलीस अधीक्षक श्री श्रीकांत धीवरे सो यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कंटेनर मध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा, पान मसाल्याची सेंधवा (मध्यप्रदेश) कडून शिरपुर कडे अबंध वाहतुक होत आहे. अशी बातमी मिळाल्यावरुन मा पोलीस अधीक्षक सो यांनी सपोनि श्री शिरसाट यांना कारवाई करण्याचे आदेश दिले त्यावरुन सपोनि श्री शिरसाठ सो, तसेच पोसई विजय पाटील, योगेश मोरे,संजय भोई, रामदास पावरा,अलताफ मिर्झा अशांनी सकाळी ०८.३० वाजता हाडाखेड आर टी ओ चेक पोस्ट जवळ जावुन संशयीत कंटेनर वाहन थांबवून त्यातील चालकास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव-अजीज शरीफ वय ४० वर्ष रा अंजनपुर ता जिगं फिरोजपुर जिल्हा नुहु(हरियाणा राज्य) असे सांगितले, त्यास सदर कंटेनर मध्ये काय माल भरलेला आहे याबाबत विचारणा केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली, त्यानंतर त्याचे संमतीने कंटेनरची तपासणी केली असता त्यात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला २९,९५,२००/- रूपये किंमतीचा रॉयल १००० नावाचा गुटखा,१२,४४,८८०/- रुपये किंमतीचा एस एन के (सनकी) नावाचा गुटखा,२०,००,०००/- रूपये किंमतीचा कंटेनर एच आर ५५ एक्स ६९१३ एकुण ६२,४०,०८०/- रुपये किंमतीचा मुददेमाल कंटेनर वरील चालक अजीज शरीफ वय ४० रा अंजनपुर ता जिर्ग फिरोजपुर जिल्हा नुहु(हरियाणा राज्य) याचे ताब्यातुन जप्त केला असुन पुढील कारवाई करीता मा सहाय्यक आयुक्त सो अन्न व प्रशासन विभाग धुळे यांना बोलविण्यात आले असुन पुढील




कायदेशीर कारवाई करीत आहोत.सदरची कारवाई मा. श्री. श्रीकांत धीवरे सो, पोलीस अधीक्षक धुळे, मा. श्री. किशोर काळे सो, अपर पोलीस अधीक्षक धुळे, मा श्री सचिन हिरे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरपुर विभाग शिरपुर यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि सुरेश शिरसाठ,सुनिल वसावे,विजय पाटील, संतोष पाटील, योगेश मोरे,संजय भोई, रामदास पावरा, चापोहेकॉ अलताफ मिर्झा यांनी केली आहे.

# माळेगाव यात्रा परिसरातील अतिक्रमणावर बुलडोझर

## सीईओ मीनल करनवाल यांचा धाडसी निर्णय : स्वतः तहसीलदार -बीडीओ कारवाईसाठी हजर

आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** माळेगावच्या श्री क्षेत्र खंडोबारायची यात्रा प्रसिद्ध आहे. यात्रा परिसरात १०० एकर मोक्याच्या जागेवर गेल्या अनेक वर्षांपासून ग्रामस्थांनी लोकांनी अतिक्रमण केले आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी' मागील आठवड्यात माळेगाव यात्रा नियोजनासाठी भेट दिली. अतिक्रमण विषय समोर आल्यानंतर त्यांनी तात्काळ ते हटविण्याचे आदेश दिले. तहसीठदार शंकर लाड बीडीओ आडेराघो यांच्या उपस्थितीत बुधवारी पोलिसांचा मोठा ताफा, पंचायत समितीचे अधिकारी - कर्मचारी यांनी १५० हुन अधिक कच्ची पक्की अतिक्रमणे जमीनोध्वस्त केली.ही कार्यवाही बुधवारी (ता.१३ डिसें) दुपार पासून रात्री उशिरापर्यंत जवळपास १० तास चालली.सीईओ करनवाल यांच्या धाडसी निर्णय व कार्यवाहीचे खंडोबा भक्तांनी जोरदार स्वागत केले आहे. माळेगाव यात्रा (ता. लोहा) खंडोबा रायाची तसेच अस्सल ग्रामीण जीवनाचे दर्शन । घडविणारी व देशपातळीवरील अश्व बाजारासाठी दक्षिण भारतात प्रसिध्द आहे. याच गावातील अनेकांनी यात्रा परिसरात अतिक्रमण केले अतिक्रमण धारक दुकाने व जागोजागी खडक टाकून यात्रेत येणाऱ्या छोट्या मोठ्या दुकानदारांकडून भरमसाठ पैसे घेऊन दुकाने- जागा किरायाने देतात. गेल्या वीस-बावीस वर्षात यात्रा काळात अतिक्रमणाचा विषय नियोजन बैठकीत आक्रमकपणे मांडला जातो. पण यात्रा संपली की चर्चा थांबते.असे नेहमीच होते जिल्हा परिषद व लोकल फंड याची ५६ हेक्टर ५६ आर इतकी म्हणजे जवळपास १४२ एकर जमीन क्षेत्र मालकीचे आहे. या यात्रेला पर्यटनस्थळ स्थळाचा दर्जा आहे म्हणून शासनस्तरावर' या यात्रेचा विकास होतो. यात्रा ही जिल्हा परिषदेच्या अखत्यारित येते. गेल्या २०-२२वर्षात माळेगाव यात्रा परिसर, मुख्य रस्ता, मंदिर परिसर, कमानी समोरच्या जागेवर याच गावातील ग्रामस्थानी अतिक्रमणे केली आहेत. टिनपत्रे तर काहींनी अर्धी पक्की दुकाने उभारली आहेत तर काहीनी किरायाने दिलीत त्यामुळे यात्रा काळात त्याची चांदी होते, मागील आठवड्यात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी माळेगाव यात्रा परिसराची पाहणी केली. माळेगावचे ग्रामविकास अधिकारी संभाजी धुळगंडे, सरपंच प्रतिनिधी हणमंत धुळगडे जागरुक ग्रामस्थांनी 'वाढत्या अतिक्रमणाकडे सीईओ यांचे यांचे वेधले. मागील २०-२२ वर्षाच्या काळात जे कोणत्याही अधिका-यांनी केले नाही ते सीईओ करनवाल यांनी करून दाखविले व अतिक्रमण काढण्याच्या सूचना



दिल्या. बुधवारी (ता.१३ डिसें) तहसीलदार शंकर लाड बीडियो आडेराघो डीवायएसपी मारोत्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली माळाकोळी चे सहायक पोलीस उपनिरीक्षक निलपत्रेवार उस्मानगर चे सपोनि श्री मुळे, यांच्या सह नऊ पोलीस अधिकारी, ५० पोलीस कर्मचारी जि प ,बांधकाम उपअभियंता एस. एस. राठोड, विस्तार अधिकारी,माळेगावचे ग्रामविकास अधिकारी संभाजी धुळगंडे, सरपंच प्रतिनिधी हणमंत धूळगंडे व ग्राम सेवक, तलाठी पंचायत समितीचे कर्मचारी असा ४० जणांचा लवाजमा सह तहसीलदार, बीडीओ माळेगाव येथे येथे सकाळी अकरा वाजता दाखल झाले दुपारी साडे बारा पासून प्रत्यक्ष कार्यवाहिला सुरुवात झाली जवळपास १४४ अतिक्रमणे जमोनोध्वस्त करण्यात आली ही कार्यवाही रात्री उशिरा पर्यंत सुरू होती.

माळेगावात अतिक्रमण करण्याची चढाओढ सुरू आहे किमान एक कोटी रुपयांचा खर्च करून अतिक्रमणधारकांनी टिनशेड , अर्धी -पक्की दुकाने उभारली आहेत .मग सेवानिवृत्त मुख्याध्यापक मागे कसे राहतील .त्यांनी यात्रा काळात ग्रामपंचायत कडे जाणाऱ्या ऐन मोक्याच्या चौकोनावर आपल्या आलेल्या पेन्शन मधील पाच लाख रुपये खर्चून शेटरची दुकाने काढली होती .यात्रेत ते दुकानदाराला किरयाने द्यायचे .पण गुरुजींच्या अतिक्रमणा वर बुलडोझर चालले .आणि व्हत्याचे नव्हते झाले . .गुरुजी . . . तुम्ही सुद्धा . . ! अशी जोरदार चर्चा सुरु होती . माळेगाव यात्रा परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमन करण्यात आले .दरवर्षी नियोजन बैठकीत विषय निघतो व नंतर थंड होतो . तत्कालीन आ चिखलीकर यांच्या पहिल्या टर्म व तत्कालीन जि प अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे यांच्या कार्यकाळात अतिक्रमण हलविण्याचा प्रयत्न झाला पण नंतर जैसे थे झाले . पण सीईओ मीनल करनवाल यांनी अतिक्रमण जमोनोध्वस्त केली त्याच्या धाडसी निर्णयामुळे यात्रा परिसर अतिक्रमण मुक्त तर झालाच शिवाय २०-२२ वर्षा पासूनच किचकट समस्येवर कायमचा तोडगा निघाला त्याच्या कामगिरीचे खंडोबा भक्तिनी जोरदार स्वागत केले आहे पुन्हा हे अतिक्रमण होऊ नये याची दक्षता घेणेची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली . जिल्हा परिषदेच्या सीईओ करनवाल मॅडम यांनी जसा धडाकेबाज निर्णय घेतला त्याच धर्तीवर कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी छत्रपती शिवाजी महाराज चौ लोहा येथील महावितरण कार्यालयाच्वया समोर झालेली अतिक्रमणे हटवून चौक मोकळा करतील काय अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे .



# धर्माबादेत मनसे झाली आक्रमक

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** आस्थापने व दुकानावरील पाट्या देवनागरी लिपी मराठीतच असणे अनिवार्य सर्वोच्च न्यायालयाने केले असतानाही धर्माबादेत बहुतांश दुकानदारांनी मराठी पाट्या लावले नसुन इंग्रजी सह इतर भाषेत असल्याने धर्माबाद येथील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. दुकानावरील इंग्रजीसह इतर पाट्या हटवा ,मराठी भाषेत पाट्या लावा अन्यथा मनसे स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा दि.१४ डिसेंबर रोजी लेखी निवेदनाद्वारे केले आहे. महाराष्ट्र हा मराठी भाषेचा राज्य आहे.प्रथम मराठी भाषेला प्राधान्य देणे अनिवार्य आहे.पण काही दुकानदार इंग्रजी सह इतर भाषेचा वापर करून पाट्या (बोर्ड) लावतात हे मराठी भाषेचा अपमान आहे, महाराष्ट्रात राहून मराठी पाट्या लावत नाही ते लाजिरवाणी गोष्ट आहे.

म्हणुन सर्वोच्च न्यायालयाचा आदेश असतानाही दुकानदार मराठी भाषेत लावत नसतील तर महाराष्ट्र नवनिर्माण सेना धर्माबाद शहर व तालुक्याच्या वतीने पाट्यांना काळे फासत तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे लेखी निवेदन नगरपालिकेचे मुख्याधिकारी सतिश पुदाके यांना दिले. निवेदन देताना महाराष्ट्र नवनिर्माण सेनाचे शहराध्यक्ष सचिन रेड्डी चाकरोड, मनसे तालुकाध्यक्ष दत्तात्रय कावडे, मनविसे ता अध्यक्ष पवन पाटील काळे, सतीश पाटील माळगे, नागनाथ पाटील माळगे, शिवानंद तोटलोड, नागनाथ कोदळे गजानन मुद्देवार, शहर व तालुका शाखेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# कोमसापतर्फे काव्य स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** कोमसाप संस्थापक अध्यक्ष मधुभाई मंगेश कर्णिक आणि कोमसाप जनसंपर्क अधिकारी रायगड भूषण प्रा. एल बी पाटील यांच्या आशीर्वादाने कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण (मधुबन कट्टा) तर्फे दर महिन्याच्या 17 तारखेला मधुबन कट्टा विमला तलाव उरण शहर येथे कविसंमेलन संपन्न होत असते. येत्या 17 फेब्रुवारी 2024 ला 100 वे कविसंमेलन संपन्न होणार आहे.100 व्या कविसंमेलना निमित्त दि.17 व 18 फेब्रुवारी 2024 रोजी उरण कोमसाप (मधुबन कट्टा )तर्फे एस एस पाटील इंटरनॅशनल स्कूल द्रोणागिरी उरण येथे राज्यस्तरीय भव्य काव्य स्पर्धा 2024 चे आयोजन केले आहे. या स्पर्धेत सहभागी 100 कवी मधून 20 कवी बक्षीस पात्र ठरणार आहेत. एकूण बक्षीसांची रक्कम 75000/-रू. असणार आहे. या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत खुल्या गटासाठी प्रथम क्रमांक 25000/ रू व्दितीय,13000/- तृतीय,8000/- चतुर्थ,5000/- तर उत्तेजनार्थ 4000/- रू रोख रक्कम बक्षीस स्वरूपात मिळणार आहे.याशिवाय सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देखील असणार आहे. तसेच राज्यस्तरीय काव्य स्पर्धे अंतर्गत विभागीय काव्यस्पर्धा देखील होणार आहे.या मध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व महिला भगिनी कवयित्रींचा गट, रायगड जिल्हा पुरूष कविबंधू गट आणि रायगड जिल्हा वगळून महाराष्ट्र राज्य पुरूष कवीबंधू गट असे तीन गट असून या तीन गटांना स्वतंत्र बक्षीसे ठेवली आहेत. या स्पर्धेत निवड फेरीत दर्जेदार कविता पाठवण्याचे आवाहन उरण कोमसाप चे अध्यक्ष मच्छिंद्रनाथ म्हात्रे यांनी केले असून निवड फेरीसाठी कविता पाठवण्याची अंतिम मुदत 10 जानेवारी 2024 आहे. निवड फेरीत कविता पाठवण्यासाठी आणि अधिक माहितीसाठी 9819652951 या व्हाट्सअप क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# आवरे शाळेत बाल मेळावा उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** रायगड जिल्हा परिषद शाळा आवरे आणि प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळा पूर्व तयारी बाल मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे यूएसएचे डेनी सर त्याचबरोबर बाल शिक्षण विभाग मुंबई आणि शाळा पूर्वतयारीचे राज्य कॉर्डिनेटर स्मितीन ब्रीद तसेच प्रथम युएसएच्या प्रमुख मल्लिका, एफसीएम हेड प्रथम संस्था हेमलता ससाने प्रथम प्रोग्राम हेड भोजराज क्षीरसागर, ग्रुप ग्रामपंचायत सरपंच श्रीमती निराताई पाटील व गावातील निपुण गट महिला पालक शाळेतील सर्व शिक्षक प्रथमचे सर्व शिक्षक प्रतिनिधी व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी बोलताना डेनी यांनी शाळेमध्ये विद्यार्थ्यांची प्रगती पाहून विद्यार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली महाराष्ट्रामध्ये शिक्षण विभागात जिल्हा परिषद मध्ये शाळांवर चांगले शिक्षण दिले जाते आणि याचा मूळ माता पालक असल्याचे त्यांनी बोलून दाखवले त्याचबरोबर नितीन ब्रिद या कार्यक्रमाचे कॉर्डिनेटर यांनी आवरे शाळेमध्ये येऊन आनंद झाल्याचे बोलून दाखवले कारण शाळा पूर्व तयारी या कार्यक्रमासाठी माता पालकांची उपस्थिती पाहून मी भारावून गेलो असे ते म्हणाले याचबरोबर आवरे शाळेमध्ये असलेल्या भौतिक सुविधांसाठी प्रथम संस्था अग्रेसिव राहील असे त्यांनी बोलून दाखवले मल्लिका हेमलता ससाणे यांनी सुद्धा शाळेबद्दल चांगले उदगार काढले प्रथम प्रोग्राम हेड भोजराज क्षीरसागर यांनी शाळेच्या सुविधांसाठी आम्ही प्रयत्न करू असे सांगितले यावेळी गावातील माता पालक शाळेतील शिक्षक गणेश गावंड, श्रीमती अरुणा तिरमाळी, सौ.कोल्हे मॅडम, श्री. आहेर उपस्थित होत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्भय म्हात्रे यांनी केले सर्व पाहुण्यांचे स्वागत शाळेचे मुख्याध्यापक बबन पाटील सरांनी केले विद्यार्थी व पालक उपस्थितीत बाल मेळावा हा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.